# मेहता मराठी ग्रंथजगत


फेब्रुवारी, २०२१
पृष्ठे ६८ किंमत : रु.१५
वर्ष एकविसावे
अंक दुसरा

## एकाच महिन्यात तिसरी आवृत्ती प्रसिद्ध
## १२,५०० प्रतींची विक्रमी विक्री

एकाच वेळी तीन स्पर्धा परीक्षा पार करणाऱ्या झुंजार अधिकाऱ्याचे प्रेरणादायी आणि न्यूनगंडाचा खात्मा करणारे आत्मकथन...

सर्वत्र उपलब्ध



'मेहता मराठी ग्रंथजगत'ची संकल्पना
सर्वप्रथम ज्यांच्या कल्पनेतून
साकारली असे
ज्येष्ठ बालसाहित्यिक, समीक्षक,
अनुवादक, संपादक

# श्री. शंकर सारडा



यांना

# भावपूर्ण श्रद्धांजली

मेहता पब्लिशिंग हाऊस | मेहता बुक सेलर्स

# मेहता मराठी ग्रंथजगत

◆ फेब्रुवारी २०२१ ◆ वर्ष एकविसावे ◆ अंक दुसरा



**संपादक**

सुनील मेहता

**संस्थापक संपादक**

शंकर सारडा

**संपादन साहाय्य**

योजना यादव

**अंकाची किंमत १५ रु.**

वर्गणी मनीऑर्डरने अथवा ऑनलाईन पाठवावी.

**प्रसिद्धी :**

दरमहा ११ तारखेस

**मांडणी-अक्षरजुळणी**

मेहता पब्लिशिंग हाऊस


## अनुक्रमणिका


| | |
|---|---|
| **संपादकीय** | ४ |
| **विशेष लेख** | ९ |
| **पुस्तक परिचय** | |
| द म्यूट् ॲक्लिट् | २२ |
| फॅक्टरी गर्ल्स | २८ |
| द रेल्वे मॅन | ३४ |
| आगमन | ३६ |
| बेशरम | ४० |
| शांघायच्या मुली | ४२ |
| प्रिस्क्रिप्शन फॉर लिव्हिंग | ४८ |
| **अभिप्राय** | ५७ |
| **दिनविशेष** | ६३ |



संपादक-मुद्रक-प्रकाशक : सुनील मेहता,
१९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड, टेलिफोन भवनसमोर,
पुणे ४११ ०३० फोन : ०२०-२४४७६९२४/२४४७५४६२
E-mail : mmgj@mehtapublishinghouse.com

‘मेहता मराठी ग्रंथजगत’ हे मासिक मालक, मुद्रक व प्रकाशक सुनील अनिल मेहता यांनी जय गणेश ऑफसेट, २०/१डी/१अ, सोमवार पेठ, महाराजा लॉज मागे, पुणे- ४११०११ येथे छापून मेहता होम, १व२ मजला, १९४१, सदाशिव पेठ, पुणे - ४११०३० येथे प्रसिद्ध केले. संपादक - सुनील अनिल मेहता.

'Mehta Marathi Granth Jagat' monthly is owned, Printed & Published by Sunil Anil Mehta, Printed at Jai Ganesh Offset, 20/1D/1A, Somvar Peth, Behind Maharaja Lodge, Pune – 411 011 & Published at Mehta Home, 1 & 2 Floor, 1941, Sadashiv Peth, Pune – 411 030. Editor – Sunil Anil Mehta.

## संपादकीय



# आधारवड हरपला...

मेहता पब्लिशिंग हाऊसच्या वाचकांनी नेहमीच आपल्या पुस्तकांवर उदंड प्रेम केलं आहे; पण वाचकांशी खरी नाळ जुळली, ती 'मेहता मराठी ग्रंथजगत'च्या माध्यमातून. ज्येष्ठ लेखक, समीक्षक श्री. शंकर सारडा यांच्या कल्पनेतून हे मासिक आकाराला आलं. मासिकानं वीस वर्षं पूर्ण केली असतानाच या मासिकाचे सल्लागार आणि आमचा आधारवड हरपला. सारडा सरांनी निर्माण केलेल्या मार्गावर मासिकाची वाटचाल सुरूच राहील; पण आज हा अंक वाचकांना सुपूर्द करताना अनेक आठवणी दाटून येत आहेत.

१९८६ साली मी मेहता पब्लिशिंग हाऊसचं काम खऱ्या अर्थाने हाती घेतलं. वडील अनिल मेहता यांनी पुण्यातल्या कार्यालयाची जबाबदारी सांभाळायला सांगितली, तेव्हा मी प्रकाशन व्यवसायात अगदीच नवखा होतो; पण तेव्हा शंकर सारडा यांच्यासारखा खंबीर आधार आणि मार्गदर्शक सोबत होता. सारडा सर नियमितपणे कार्यालयात यायचे. स्वतंत्र लेखन आणि समीक्षेच्या क्षेत्रात त्यांनी स्वतःचा ठसा उमटवला होताच; पण त्यांना संपूर्ण प्रकाशन व्यवसायाविषयीही आस्था होती. पुस्तक विक्रीच्या नवनवीन कल्पनांविषयी ते सतत चर्चा करत. तेव्हाच्या काळी विक्री आणि विपणनाची माध्यमे मर्यादित असली, तरी सारडा सरांची कल्पकता

मोठी होती. ते वाचकांशी संवाद साधण्यावर भर देत. त्यातूनच त्या काळी अनेक पुस्तक प्रदर्शने आणि संबंधित विक्री कल्पना राबवता आल्या.

सातारा ग्रंथ महोत्सव म्हणजे तर सारडा सरांच्या कल्पनेचं मूर्तिमंत रूपांतर. त्यांच्या कल्पनेतून साकारलेला हा महोत्सव आजही जोमात सुरू आहे आणि साताऱ्यासारख्या जिल्ह्यातील वाचक-रसिक या महोत्सवाचा लाभ घेत आहेत. या महोत्सवानं छोट्या-मोठ्या सर्वच प्रकाशकांनाही चांगलं व्यासपीठ मिळवून दिलं आहे. ग्रंथविक्रीला हातभार लावला आहे. त्यांनी महाराष्ट्र टाइम्ससोबत शंभर पुस्तकांची यादी देण्याची जी योजना राबविली, त्यामुळेही प्रकाशकांना असाच लाभ झाला. वाचकांना शंभर दर्जेदार पुस्तके माहीत झालीच; पण सोबतच त्या पुस्तकांची विक्रीही वाढली.

जगभर भ्रमंती केलेल्या सारडा सरांनी जागतिक प्रकाशन व्यवसाय जवळून अनुभवला होता. त्यामुळे पुस्तक विक्रीची दालनं, प्रकाशकाचं कार्यालय या विषयीही त्यांच्याकडे अनेक कल्पना असत. ज्यांच्याविषयी आमच्या चर्चा होत. प्रकाशनाच्या कार्यालयातील विभाग कसे असावेत, पुस्तक निर्मितीचं विभागीय नियोजन कसं असावं, या विषयीही त्यांनी वेळोवेळी मार्गदर्शन केलं.

पुस्तकांवर सर्वार्थाने प्रेम करणाऱ्या सारडा सरांनी मेहता पब्लिशिंग हाऊससाठी एक खास पुस्तकही लिहिलं. 'ग्रंथविशेष' नावाच्या या पुस्तकात विविध ग्रंथांची माहितीवजा परीक्षणे होती. या पुस्तकातून त्यांचं पुस्तकप्रेम खऱ्या अर्थाने प्रतिबिंबित होतं.

मराठी साहित्यात असलेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाकडेही ते गांभीर्याने पाहत. सातारा इथे झालेल्या संमेलनात सारडा सरांनी अमूल्य योगदान दिलं. संमेलन केवळ निमंत्रितांपुरतं मर्यादित न ठेवता ते वाचककेंद्री करण्याचा प्रयत्न त्यांनी केला. त्यामुळे आजही साहित्य संमेलनाच्या आयोजनात त्यांच्या मार्गदर्शक विचारांची गरज जाणवते.

शंकर सारडा म्हणजे बालसाहित्यापासून ते समीक्षेपर्यंत अनेक साहित्य प्रवाहात मुशाफिरी करणारं नाव. या नावाचा ठसा मराठी साहित्यात कायम राहील. त्यांच्या स्मृतीस विनम्र अभिवादन!



# मेहता मराठी ग्रंथजगत

**नवनवीन पुस्तकांच्या अद्ययावत माहितीसाठी आजच वर्गणीदार व्हा.**

## आमच्या छापील अंकाची वर्गणी

त्रैवार्षिक वर्गणी ४५०रुपये
पंचवार्षिक वर्गणी ६००रुपये

## डिजिटल अंकाची वर्गणी

त्रैवार्षिक वर्गणी ३००रुपये
पंचवार्षिक वर्गणी ४००रुपये

आमच्या पुस्तकांविषयी आणि नवीन योजनांविषयी जाणून घेण्यासाठी
सर्व ग्रंथालयांना नम्र विनंती
कृपया आपला संपूर्ण पत्ता, (तालुका, जिल्हा, पिनकोडसहित),
मेल-आयडी, फोन नंबर, मोबाईल नंबर ही माहिती आमच्या
खालील व्हॉट्स अप नंबरवर कळवावी.
९४२०५९४६६५

# वाचकांसाठी सुवर्णसंधी!

# WORDPOWER

## बेळगाव / कोल्हापूर

पुस्तके, खेळणी, स्टेशनरी, म्युझिक,
मूव्ही, गेम्स इत्यादी बरेच काही
आता वर्डपॉवरच्या एकाच दालनात उपलब्ध आहे.
सुट्टीचा आनंद पुरेपूर लुटण्यासाठी अवश्य भेट द्या.

**बेळगाव, कोल्हापूर येथील वर्डपॉवरचे पत्ते पुढीलप्रमाणे**

कामत टॉवर, पहिला मजला, आरपीडी कॉलेजसमोर,
टिळकवाडी, बेळगाव -५९०००६.
मोबाईल - ७८८८२७७१९०

स्टार बझार, जुना पुणे-बेंगलोर हायवे, कोल्हापूर – ४१६००१.
मोबाईल - ९५१८९१२२६९

**अधिक माहितीसाठी संपर्क**

**wordpowerbookshop@gmail.com**

Find us on
Facebook

https://www.facebook.com/mehta.publishinghouse

सर्व प्रकारची महाविद्यालयीन पुस्तके, यूपीएससी, एमपीएससी,
सेट-नेट, इंजिनिअरिंग, मेडिकल, मॅनेजमेंट, सायन्स, कॉम्प्युटर इ.
विविध विषयांवरील क्रमिक व संदर्भ पुस्तके यांचे माहेरघर

# मेहता बुक सेलर्स

३२२, भाऊसिंगजी रोड, भवानी मंडपाजवळ,
कोल्हापूर ४१६ ०१२
वेळ : सकाळी ९.३० ते रात्री ८ (शनिवारी बंद)
फोन : (०२३१) २५४२९०१/२५४२३०४/२५४१८८१
Email : mehtabooksellers@gmail.com

**मेहता पब्लिशिंग हाऊस**

amazon GET IT ON Google Play Get it on Apple Books

यांच्या संयुक्त विद्यमाने
नाहीत स्कॅन केलेली पाने किंवा नाहीत पीडीएफ्स...
मराठीत प्रथमच, खरीखुरी eBooks युजर फ्रेंडली, वाचायला सोपी,
सोयीस्कर- थेट तुमच्या कॉम्प्युटर, आयपॅड आणि अॅन्ड्रॉइड टॅब्लेटवर!

इथे मिळतील ई-बुक्स...

**eBooks**

**www.amazon.in**

**play.google.com**

**https://books.apple.com**



**Online** पुस्तके खरेदी करा **www.mehtapublishinghouse.com**



## उत्तम साहित्यिक जाण असणारा सर्जनशील...

मराठी साहित्याची प्रदीर्घ वाटचाल अनुभवलेली आमची पिढी. आमच्या पिढीतलं साहित्यप्रेमही तितकंच निखळ आणि निर्मळ. अशीच उत्तम साहित्यिक जाण असणारे आमचे मित्र, ज्येष्ठ समीक्षक, लेखक, संपादक श्री.शंकर सारडा. आज सारडांना अखेरचा निरोप देत असताना माझ्या प्रकाशक म्हणून असलेल्या कारकिर्दीचा पटही नजरेसमोरून जात आहे.

मी नुकतंच सदाशिव पेठेत पेरूगेटला मेहता पब्लिशिंग हाऊसचं कार्यालय थाटलं होतं. त्या काळात आमची ओळख झाली. पुस्तकांवर जिवापाड प्रेम करणारे सारडा कार्यालयात येऊ लागले आणि हा संवाद दिवसेंदिवस बहरत जाऊ लागला. नवी पुस्तकं, प्रकाशन-साहित्य विश्वातले नवे प्रवाह असे अनेक विषय गप्पांमध्ये रंगू लागले. सारडा पुस्तकांचं संपादन करतच; पण त्यांचा पत्रकारितेतही हातखंडा होता. आमच्या भेटीदरम्यान त्यांनीच पब्लिशिंग हाऊसची गृहपत्रिका सुरू करण्याची कल्पना दिली. सारडांनी सुचवलेल्या कल्पनेला त्यांच्याच माध्यमातून वास्तवात उतरविण्याचं मी ठरवलं. त्यांना गृहपत्रिकेसाठी नाव सुचवण्यास सांगितलंच; पण त्याच्या संपादनाची जबाबदारीही सारडांनी सांभाळावी, असा प्रस्ताव

ठेवला. अनेक वर्षांचा काळ लोटला असेल या गोष्टीला; पण त्या काळी मेहता मराठी ग्रंथजगतशी जोडलेलं शंकर सारडा हे नाव आजही जोडलेलं आहे आणि सारडा आज सोबत नसले तरी त्यांनी आखून दिलेल्या मार्गावरच या अंकाची वाटचाल सुरू राहील.

सारडांचा साहित्य वर्तुळातला वावर मोठा होता. माझ्यासोबत इतरही अनेक प्रकाशकांशी त्यांचा सतत संपर्क असायचा. त्यातूनच अनेक पुस्तकांच्या कल्पना आकाराला येत असत. त्यांची पुस्तकांची परीक्षणं चांगल्या पुस्तकांची ओळख घडवत. त्या परीक्षणांनी मराठीला एक थोर समीक्षक दिला. त्यांची ही समीक्षक म्हणून सुरू झालेली वाटचाल मार्गदर्शकाच्या भूमिकेतही अधिक चपखल बसत होती. नव्या लिहित्या लेखकांना त्यांनी वेळोवेळी प्रोत्साहन दिलं, ज्यातून मराठी साहित्यात नव्याने लिहिणाऱ्यांची एक पिढी घडली, असं म्हटल्यास वावगं ठरणार नाही. ते नवोदित लेखकांना मार्गदर्शन करत असत. बरेच नवोदित लेखक त्यांच्याकडे पुस्तक संपादनासाठी देत असत. त्या कामात सारडांना खरा आनंद गवसत असे.

सारडांचा मराठी साहित्यासोबतच पाश्चिमात्य साहित्याचाही गाढा अभ्यास होता. त्यांच्या अनेक परदेशवाऱ्यांमधून त्या अभ्यासाला आणखी चालना मिळत होती. परदेशी गेल्यावरही ते तिथल्या ग्रंथालयांत रमत असत. तिथे त्यांना अनेक नवी पुस्तके वाचायला मिळत. ते भारतात परतले की सोबत नव्या पुस्तकांच्या माहितीचा खजिना सोबत घेऊन येत आणि मग आमच्या गप्पा आणखी रंगत. त्यांनी पाहिलेले परदेशी साहित्यिक, ग्रंथालयं



या सगळ्यांची ते मला भारतात बसल्या बसल्या भेट घडवत. अनुवादासाठी नवनवी पुस्तकं सुचवत आणि त्यातून मराठी वाचकांना नवा साहित्यिक ऐवज अनुभवायला मिळत असे.

सारडा यांच्या शोधक, कल्पक वृत्तीचा मराठी साहित्याला अनेक अर्थांनी लाभ झाला. त्यांनी महाराष्ट्र टाइम्ससाठी सुरू केलेली योजनाही अशीच अभिनव होती. त्यांनी महाराष्ट्र टाइम्समध्ये त्यांच्या कल्पकतेनुसार शंभर पुस्तकांची यादी दिली होती, या पुस्तकांवर सुजाण वाचकांसाठी सवलतही देण्यात आली. यामुळे अनेक मराठी वाचकांना फायदा घेता आला आणि तिथून खरी वाचनसंस्कृती बहरत गेली, असं मला वाटतं. वर्तमानपत्रांच्या माध्यमातून नामनिर्देशित झालेल्या या पुस्तकांकडे वाचकांचा ओढा वाढला आणि पर्यायाने आम्हा प्रकाशकांनाही नवं व्यासपीठ मिळालं.

शंकर सारडा यांचं साहित्यिक योगदान एखाद्या लेखात सामावणार नाही. 'मराठी साहित्याचा सच्चा सेवक' हीच त्यांच्यासाठीची उपाधी असेल. जो आजन्म साहित्याची सेवा करत राहिला. आपलं जगणं समृद्ध करता करता त्यानं भाषासमृद्धीचं कामही केलं. अशा महान, सर्जनशील व्यक्तिमत्त्वास भावपूर्ण श्रद्धांजली!

**– अनिल मेहता,**

संस्थापक, मेहता पब्लिशिंग हाऊस

### ग्रंथचळवळीचा आधारवड हरपला...

मराठी प्रकाशन व संपादन क्षेत्रात शंकर सारडा यांनी अव्वल कामगिरी केली. गेली सुमारे पाच दशकं लेखन, संपादन आणि समीक्षा क्षेत्रात सारडांनी मोलाचं योगदान दिलं.

केवळ लेखनच नव्हे, तर मराठी ग्रंथव्यवहाराची नाडी सारडांना अवगत होती. महाराष्ट्र टाइम्सची रविवार आवृत्ती, मेहता मराठी ग्रंथजगत आणि अनेक लिहित्या लेखकांचे सारडा आधारवड होते.

सातारा येथील ग्रंथमहोत्सव तुफान ग्रंथविक्री आणि नेटके आयोजन यासाठी ओळखला जातो, यात सारडांचं योगदान मोठं होतं.

त्यांना विनम्र आदरांजली!!!

**– अरुण नाईक**

## चौथ्या नवतेला प्रोत्साहन देणारा पहिला ज्येष्ठ समीक्षक

'नव्यांची अक्षर चळवळ'मध्ये माझा लेख आला (१९९२) आणि सगळीकडून टीका सुरू झाली. ही चौथ्या नवतेच्या चळवळीची जाहीर सुरवात होती. अरुण म्हात्रेने लेख छापला; पण विरोधही केला. त्या वेळी 'नव्यांची अक्षर चळवळ' हा नव्या कवींना मोठाच आधार होता आणि नेमका तोच चौथ्या नवतेच्या चळवळीला पाठिंबा देणार नाही, हे स्पष्ट झालं. म.सु. पाटलांनी 'अनुष्टुभ'च्यावतीने आधीच नकार दिला होता 'सत्यकथा' बंद पडली होती आणि अनियतकालिकांच्या चळवळीने दम तोडला होता. अशा वेळी आता आपणच हातपाय हलवायला हवे, हे स्पष्ट झालं आणि मी 'सौष्ठव' नावाचं अनियतकालिक सुरू करायचं निश्चित केलं. भालचंद्र कुबल या माझ्या परम मित्राने या निर्णयाला केवळ पाठिंबा दिला नाही तर अंकाची प्रकाशक म्हणून जबाबदारी स्वीकारली. आशुतोष आपटे, संतोष क्षीरसागर (हा आता जेजेचा डीन झालाय) यासारखे जेजेईट व मंगेश बनसोड, आल्हाद भावसार, महेश म्हात्रे यांच्यासारखे हॉस्टेलाईट जॉईन झाले. पुढे कालनिर्णयच्या (बहुधा जयराज) साळगावकरांनी अंक छापायचं कबूल केलं आणि 'सौष्ठव'चा पहिला अंक अतिशय देखण्या रूपात छापला गेला. प्रश्न होता तो पब्लिकमध्ये आणायचा कसा. मी आणि भालचंद्र कुबल यांनी हा अंक साहित्य संमेलनातच आणायचा, असं जाणीवपूर्वक निश्चित केलं.

नव्यांची अक्षर चळवळ काय घेऊन येणार, हा प्रश्न होता. नेमक्या याच वेळी 'अभिधा'चा हेमंत दिवटे सुरेश भटांना आदरांजली म्हणून गज़ल विशेषांक घेऊन येणार होता, ज्याचं संपादन माझी मैत्रीण नीता भिसे करणार होती. नवीन पिढीच इतकी पारंपरिक भूमिका घेऊन येत असेल तर आमच्या अंकाचं काय होणार, हे उघड होतं; पण अचानक एका अनपेक्षित व्यक्तीकडून पाठिंबा आला आणि सर्व बदललं. ही व्यक्ती होते शंकर सारडा! सारडांनी ही नवीन पोरं काहीतरी नवीन घेऊन आलीत म्हणून आमच्या अंकाबद्दल बोलायला सुरवात केली. पुढे दैनिक 'पुढारी'त त्यांनी या अंकावर एक स्वतंत्र लेखच लिहिला. माझ्या लेखातील निरीक्षणे त्यांनी नवीन पिढीची निरीक्षणे म्हणून मांडली. यामुळे वातावरण थोडं बदललं आणि

चौथ्या नवतेचं स्वागत करायला हवं, असा निदान विचार तरी पुढे आला. नवीन पिढीतील अनेकजण त्यामुळे मला भेटायला आले. त्यात अभिजित देशपांडे, मनोज जोशी, नितीन रिंढे हे एम. ए.चे महत्त्वाचे विद्यार्थी होते. हेमंत दिवटे नंतर आला आणि आम्ही एकत्र काम करायचं ठरवलं.

पुढेही सारडांनी कायमच प्रोत्साहन दिलं. आमच्या पहिल्या भेटीनंतर मी त्यांना फार कमी भेटलो; मात्र त्यांच्या सभ्यतेचा व खुलेपणाचा परिचय घनदाटच राहिला. ते एका मारवाडी कुटुंबात जन्मले होते. मारवाडी लोक फक्त व्यापार करतात, असा लोकांचा गैरसमज आहे. प्रत्यक्षात मारवाड्यांनी उत्तम लेखन केलं आहे आणि भारतीय व्यापारी समाजाची समज मारवाड्यांच्या साहित्यातून प्रकटली आहे. जगभर फिरल्याने सारडांना नवीन जगाचं भान होतं. त्यांचा खुलेपणा आकस्मिक नव्हता. त्याला वैश्विक साहित्याच्या अफाट वाचनाची जोड होती. साहित्यिक व समीक्षा, या दोहोंनाही घडवावं लागतं, हा त्यांचा विश्वास होता आणि या विश्वासापोटी मराठी साहित्य संस्कृतीची काळजी त्यांनी घेतली. त्यांनी लिहिलेल्या बालकथा अद्‌भुत वळणाच्या होत्या. हजारो पुस्तकांची त्यांनी परिचय समीक्षा लिहिली. ह. मो. मराठ्यांची ‘निष्पर्ण वृक्षावर भर दुपारी’सारखी त्या काळी स्फोटक वाटलेली अस्तित्ववादी कादंबरी संपादक म्हणून त्यांनी छापली. ऐन तारुण्यात ते मटाच्या रविवार पुरवणीचे संपादक होते, हे सर्व जाणतातच. ‘स्त्रीवादी कादंबऱ्या’ हा त्यांचा सर्वांत महत्त्वाचा ग्रंथ; कारण तो फार सुरवातीला आला होता, ज्या वेळी स्त्रीवादाची फारशी चर्चाही नव्हती.

ते एका अर्थाने नव्यांची प्रायमरी अक्षर चळवळ होते, ज्यातून त्यांचे प्रोत्साहन जन्मले. त्यांच्या या प्रोत्साहनाचा मी कायमच ऋणी राहीन. आस्वादक समीक्षेचा एक धुरंधर निघून गेला.

त्यांना माझी आदरांजली !

**– श्रीधर तिळवे-नाईक**

## शंकर सारडा : निष्ठावंत अभ्यासक ते रसिक समीक्षक



शंकर सारडा हे साहित्याचे निष्ठावंत अभ्यासक होते. मराठी आणि जागतिक साहित्याचे चिकित्सक आणि चौफेर वाचन करणारे, स्वतंत्र वाङ्मयीन दृष्टी असणारे आणि मूलतत्त्व जपणारे साक्षेपी समीक्षक होते. त्यांनी अनेक लेखकांच्या साहित्यकृतींची वैशिष्ट्ये मोठ्या खुबीने वाचकांना सांगितली. त्यांचे वृत्तपत्रांतील,साप्ताहिकांतील ग्रंथ परिचय हे आस्वादक समीक्षेचे वाचनीय नमुने आहेत. त्यांचा 'ग्रंथ चैतन्य' हा समीक्षा ग्रंथ मराठी साहित्यातील अक्षरलेणे आहे. त्यांच्या समीक्षेतून भाषेचे सौंदर्य आणि विचारांचे सामर्थ्य प्रत्ययाला यायचे. साहित्यकृतीचे योग्य मूल्यमापन आणि स्वागतशील वृत्ती, याशिवाय प्रासादिक भाषाशैली ही त्यांच्या समीक्षेची वैशिष्ट्ये होती. साहित्य-शास्त्राच्या मूलतत्त्वांची प्रगल्भ जाण असणारे एक रसिक समीक्षक म्हणून त्यांनी स्वतःची स्वतंत्र ओळख निर्माण केली होती. त्यांनी अ.भा.मराठी साहित्य संमेलनाचं नेटकं आयोजन आणि 'अजिंक्यतारा'या स्मरणिकेचं दर्जेदार संपादन केलं होतं. सातारा जिल्हा ग्रंथ महोत्सवाचे अध्यक्ष म्हणून त्यांनी वाचन संस्कृतीला बळ दिलं. अनेक नवोदित लेखक-कवींच्या पाठीवर हात ठेवून त्यांना लिहिते करण्यात ते आघाडीवर असायचे. त्यांच्या निधनाने आपण साहित्यावर अकृत्रिम प्रेम करणाऱ्या एका रसिक समीक्षकाला मुकलो आहोत.

**– प्राचार्य डॉ.यशवंत पाटणे**

कार्यवाह,

सातारा जिल्हा ग्रंथ महोत्सव समिती

**– प्रल्हाद पारटे**

सहसमन्वयक

जिल्हा ग्रंथ महोत्सव समिती

## सावली : समीक्षक शंकर सारडांची

''सारडा साहेब, एक पुस्तक अर्पण करायचयं तुम्हाला. तुमची परवानगी हवी आहे.''

''कोणतं हो? काय नवीन?''

तोच उत्साह, पण आवाज थकलेला.

दीर्घ निबंधांचा संग्रह काढून लघुनिबंधाच्या परंपरेलाच वेगळा फाटा द्यायचं ठरवलं. या प्रकाराकडे वळवलं होतं या वाचनवेड्या संपादकाने. ''लेखक म्हणून तुम्ही कसे घडला?'', ''एकूण साहित्य परंपरेत तुमचं स्थान काय?'', ''तुमच्या आयुष्यातील प्लेसमेन्ट-म्हणजे महत्त्वाच्या गोष्टींचा क्रम लावा.'' आयुष्यभर लिहिलेले पंचवीस-तीस दीर्घ निबंध निघाले. शक्य तेवढ्या भिन्न जाती-धर्मातील लोकांना पुस्तकं अर्पण करायचं ठरवलं होतं. त्याला अपवाद करावा लागणार होता. पूर्वी सत्यकथेचे संपादक राम पटवर्धन यांच्यावर लेखही लिहिला होता आणि त्यांना 'कागूद आणि सावली' अर्पण केले होते. या निबंधात पाच निबंध सारडांच्या प्रेरणेने लिहिले होते. कर्मवीर भाऊराव पाटील यांना एक पुस्तक अर्पण केलं होतं. जैन नि मारवाडी यांतील साम्य-भेदही मला माहीत नव्हते आणि सारडांच्या घरात किंवा डॉ. निर्मला सारडांच्या घरात आणि वागण्यात कधीच जात-धर्माची चिन्हव्यवस्था दिसली नव्हती. सात वर्षांच्या पुण्यातील माझ्या सेवानिवृत्तीच्या नंतरच्या काळात हेच माझं हक्काचं गप्पांचं घर होतं. त्यांनी पुण्याला स्थलांतर करायला लावलं होतं. त्यांना आणि जन्मात न भेटलेल्या स्टीफन टोटोसी डी झिपेत्नेक या नामवंत तुलनाकार-संपादकाला दीर्घ निबंध अर्पण करायची कल्पना सुचली. अमेरिकेतील ड्यूक विद्यापीठाच्या 'तुलनात्मक साहित्य व संस्कृती' या नियतकालिकाच्या संपादकाचा स्नेह असाच जुळला आहे. सारडांची परवानगी घेणे हा औपचारिकपणाचा भाग होता.

खंत एकच आहे. कोरोनाच्या महामारीने विद्रोही साहित्य संमेलन आणि पुस्तकाची छपाई देखील रखडली. सारडांच्या निधनाची बातमी डॉ. मंगेशने सांगताच खंत दाटून आली. सारडा आता ती अर्पण पत्रिका वाचायला नाहीत... ''पाटील, सुचेल तसं लिहीत राहा. कुणी प्रसिद्ध करो न करो.

तुम्हाला समजून घेणारा ताकदीचा वाचक वर्ग आज मराठीत नाही. पन्नास वर्षांनंतर तो तयार होईल.'' मी अमेरिकेतून परतल्यानंतर असंच झालं. जगभरचं नवं आणायची ओढ आपणाला असते. 'महाराष्ट्र टाइम्स'मध्ये 'पाश्चात्य प्रतिभावंत' सदर सुरू केलं तेव्हा असंच झालं... तो लेखसंग्रह त्यांनी मला इंग्रजीचा प्राध्यापक म्हणून भेट दिला होता.

एकदा अशाच गप्पांच्या ओघात सहा महिन्यांपूर्वी ते म्हणाले होते, ''पाटील, तुम्हाला नवं नवं सुचतंय हे विशेष. पुणे सोडून तुम्ही कोल्हापूरजवळ स्वगृही 'अरण्यानंद' संस्था काढली याचंही मला कौतुक वाटलं; पण भरपूर लिहा. वयाची ऐंशी ओलांडल्यावर इच्छा असूनही काही करणं जमत नाही. शरीर साथ देत नाही. माझं बघताय. आता वाटतं लवकर मरण यावं...''

त्यांच्या निधनानंतर इंग्रजी-मराठीत एम. ए. केलेल्या या ज्युनिअर साने गरुजींच्या जीवनाचा माहितीपटच पुन्हा उलगडला. साने गुरुजींना भेटायला लांबचा प्रवास करून जाणारा मारवाडी व्यापाऱ्याचा पोर बालसाहित्य लिहितो हेच एक नवल होतं. माझ्यावर या माणसाची सावली साताऱ्यात पडायला निमित्तही वाङ्‌मयीन होतं. कदाचित, इंग्रजी स्पेशल घेऊन बी. ए. व्हायची जिद्द बाळगलेल्या विशाळगड फाट्यातल्या जिरायत शेतकऱ्याच्या पोराची वेगळीच लागण व्हायची ती वेळ असावी. आम्हाला गो. नी. दांडेकरांची 'पवनाकाठचा धोंडी' कादंबरी शिकवणारे प्रा. एस. एस. भोसले आमच्या वसतिगृहातच जेवायला यायचे. त्यांचाच विषय निवडणार म्हणणारा शंकर दुधाळे आपल्या खोलीत जेवण काढून ठेवायचा. आम्ही तिघेही कोल्हापूरकर. त्यामुळे जिव्हाळा वाढत होता. दुधाळेचं हस्ताक्षर फार देखणं. भोसले सर त्यांच्या लेखाची प्रत काढायला त्याला सांगायचे. तेव्हा 'महाराष्ट्र टाइम्स'च्या रविवारच्या पुरवणीत आलेला भोसले सरांचा लेख वसतिगृहात जणू काय तो स्वतःचाच म्हणून दुधाळे मिरवत आला. 'पवनाकाठचा धोंडी' ही कादंबरी 'अवास्तव' कशी आहे, हे पटवणारा तो लेख होता. सर्वच मुलं गरिबांच्या घरातून खेड्यातून आलेली; पण संभाजी भोसले नावाचा तरुण प्राध्यापक एका गड, किल्ले चढणाऱ्या, दाढी वाढवत फिरणाऱ्या, बुवासारख्या दिसणाऱ्या लेखकाला असा झोडपतो, हे आमच्यासाठी एक आश्चर्यच होतं. त्याहीपेक्षा तो छापणारा संपादक किती धाडसी असेल?

भोसले सरांच्यामुळे मी रणजित देसाई व कुसुमाग्रजांच्या सह्या वहीतच घेतल्या होत्या. त्यांनीच सारडा साताऱ्यात आल्याचं दुधाळेला सांगितलं. मला त्यांच्यामुळे भरपूर मराठी पुस्तकं वाचायला मिळायची. मी दुधाळेला जास्त जपत असे.

''ये एब्या, लवकर ये. शंकर सारडांना भेटायला गावात जायचंय...''

धारदार नाकाच्या, गोऱ्यापान, पण ठेंगण्या, साध्या विजार-शर्टातील माणसानं हसत आमचं स्वागत केलं. हा संपादक सूट-बूट, कोट-टायमधला नव्हता. त्यानं आमचं नाव, गाव, शेती, घरची परिस्थिती वगैरे माहिती फार आपुलकीनं करून घेतली. काय वाचावं, कसं वाचावं. जमल्यास लिहायचा प्रयत्न करा. दलित साहित्यावरची 'महाराष्ट्र टाइम्स'ची पहिली पुरवणी त्यांनीच काढली होती. नेमाड्यांच्या 'कोसला'वरील सॅलींजरच्या 'कॅचर इन द राय'च्या प्रभावाची चर्चा त्यांच्यामुळेच सुरू झाली. या सर्व पारदर्शी व नितळ बोलण्यात तरुण मुलांना प्रेरणा देणारी उफाळती ऊर्जा कशी उपकारक ठरली, याचा अर्थ या दुःखद घटनेनंतर उमगू लागला. हाच सद्गृहस्थ मला गाजलेल्या ग्रंथ महोत्सवाच्या उद्घाटनाच्या प्रमुख पाहुण्याचा मान दोन वेळा, साहित्य संमेलनात, बाल साहित्य संमेलनात सातारला भाषणे करायला लावेल हे मला शेहेचाळीस वर्षांपूर्वी स्वप्नातही कधी वाटलं नव्हतं. परिचित तरुणांच्या विकासावर त्यांचं बारीक लक्ष असे. लेखक घडवण्याच्या त्यांच्या हातोटीचं महत्त्व खऱ्या अर्थाने त्यांच्या नसण्याने जास्त खोलवर जाणवून दिलं. सर्वांना समजून घेत मधल्या मार्गाची निवड करण्याचा त्यांचा स्वभाव होता. कुठल्याही संघर्षाची वाट त्यांच्या स्वभावात नव्हती. 'महाराष्ट्र टाइम्स'ने १९८०च्या दशकातील सर्वोत्कृष्ट कादंबऱ्यांच्या यादीत माझ्या 'कागूद आणि सावली' ची निवड केली. त्या निवड समितीत ते होते. माझ्या 'मराठी नाटकावरील इंग्रजी प्रभाव'चं परीक्षण करूनच ते थांबले नाहीत. टोपण नावाने लिहिलेल्या सदरात मिश्किल टिपणीही केली ''मराठीतील थोर नाटककार चोर कसे आहेत, हे वाचताना चीड येते. मनाला पटत नाही; पण करता काय. प्रत्येक विधानाला पुरावा दिला आहे. हे पुणेकर विद्वानांनो, सावध. एका अभ्यासू विद्वान पाटलाचा उदय झाला आहे.'' हे केवळ कौतुक नसे.

'पाटलाची लंडनवारी' हे नामकरण नाट्यमय प्रसंगाने झालं. मुळात ते 'परदेशी परिक्रमा' असं कोल्हापुरात सामान्य प्रकाशकाने छापलं होतं. त्याच्या परीक्षणात सारडांनी त्याच्या 'रद्दी' छपाईवर शेरे मारले; पण लेखक उपकारांच्या ओझ्याखाली दबला आहे. नको त्या तपशिलाने जडावले आहे, असे माझे कानही उपटले होते. पुढे ते पुणे विद्यापीठाच्या अभ्यासक्रमात 'पाटलाची लंडनवारी' म्हणून नेमलं गेलं. ते माझ्या कार्यक्रमाचं नाव होतं. त्याचं पुनर्लेखन करताना सारडांच्या सूचना फार उपयोगी पडल्या. कसलीही अपेक्षा न ठेवता फुकटचा उपदेश असा मिळाला.

त्याचा गैरफायदा मी पुढे त्यांच्या प्रेरणेने पुण्यात स्थलांतर केल्यानंतर घेतला. गोवा विद्यापीठात असताना पत्रसंपर्क होता. 'इच्छामरण' कादंबरीचं साडेतीनशे पानांचं हस्तलिखित त्यांना वाचायला दिलं. ''अखंड गाव उभा करणारी ही मराठीतील पहिली इपॉक मेकिंग (युगप्रवृत्तक) कादंबरी आहे; मात्र उत्तराधुनिक शैली मराठीत रुजायला अजून पन्नास वर्षे जावी लागतील. तोपर्यंत थांबा.'' माझं यशवंतराव चव्हाणांच्यावरील 'ग्रंथांनी रचलेला महापुरुष' त्यांना फार आवडल्याचं ते जाणवून देत; कारण यशवंतराव चव्हाणांच्या वाचनाबद्दल त्यांना फार आदर होता. त्याचे काही संदर्भही मी त्या पुस्तकात दिले होते. तुलनाकार म्हणून माझी होणारी वाढ त्यांना वेगळी व महत्त्वाची वाटे; परंतु सांस्कृतिक अभ्यासाकडे मी वळल्यानंतर परदेशी सिद्धान्ताआधारे साहित्याच्याच जातियीकरणाच्या प्रक्रिया जातीच्या उल्लेखानिशी करू लागलो. यावर आमचा खटका उडायचा. मनातून त्यांना मला तुलनात्मक साहित्य व सांस्कृतिक अभ्यासात परदेशी नियतकालिकांनी दिलेली मान्यता, नवतेची ओढ, नव्या उपक्रमांची चर्चा हे आवडायचं; परंतु तशा योजना मराठीत एकारलेल्या संस्कृतीत आणण्याची अडचण त्यांना दिसत असे. प्रकाशन व्यवसायाचे अंतरंग, त्यांचे बंडखोर शिक्षक श्री. के. क्षीरसागर यांच्याबद्दल ते अधूनमधून बोलायचे. मराठीतील लेखकरावांच्या गटबाजी व अभ्यासक्रमांत पुस्तके नेमण्यातील घोटाळे त्यांना चांगले माहीत होते. त्यामुळे मी वैर वाढवणाऱ्या तुलनांच्या भानगडीत पडणं त्यांना पसंत नव्हतं. तसं त्यांनी मला नांदेड विद्यापीठात त्यांना राष्ट्रीय चर्चासत्राच्या उद्‌घाटनाला प्रमुख पाहुणे म्हणून बोलावलं होतं तेव्हा मला सावध केलं होते. लेखक या एका संकल्पनेवर स्वतंत्र पुस्तक करायला सांगितलं होतं. त्यामुळे

या विषयावर दोन-तीन लेखही लिहून झाले. नव्या नव्या कल्पना सुचवणारा हा मोठा प्रेरणेचा स्रोत होता. मराठी वाचक तेवढा परिपक्व नाही म्हणायचे; पण साहित्याच्या व संस्कृतीकरणातील जातियीकरणाचा अनुभव त्यांना अ. भा. साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदाच्या निवडणुकीने दिला. नीता भिसे, डॉ. निर्मला सारडा यांच्याबरोबर त्यांनी मलाही महाबळेश्वरला एका बैठकीला नेलं होतं. तेव्हा दीर्घ काळ सर्वसमावेशक भूमिका घेत साहित्य सेवेला वाहून घेतलेल्या सारडांची निवड व्हावी, असं साने गुरुजीपंथीय मंडळींना वाटत होतं. झालं भलतंच. निवडून आलेले आनंद यादवही वादात अडकले. सारडांनी स्वतःचं प्रकाशनही काढलं होतं. मेहता मराठी ग्रंथजगत, साताऱ्यातील ग्रंथ चळवळीचे जनक आणि भाषणे देत ते पुण्यात रमले होते. मुलगा अमेरिकेत घर बांधून स्थिरावला होता.

'समग्र बा. सी. मर्ढेकर : तुलनात्मक सांस्कृतिक मीमांसा'ची मुद्रित प्रतच मी त्यांना वाचायला दिली. त्यांनी मुद्रणदोष विनावेतन काढून दिले आणि पाठ थोपटली. ''मराठीला हे मूर्तिभंजन जड जाईल; पण हे पुस्तक नवी दिशा देणारं आहे,'' असं ते म्हणाले होते. तोपर्यंत सारडा बदलले होते. मी अरण्यानंद प्रतिष्ठानचे सल्लागार म्हणून नाव घातले. त्यालाही त्यांनी संमती दिली. सेवानिवृत्तीनंतर गगनबावड्या जवळच्या पंचवीस एकरांत वेगळे प्रयोग करायचं स्वप्न होतं. त्याच्या प्रगतीची चौकशी ते करायचे. लेखातील अवघड मुद्दे सोपे करायला तळटिपा द्या. संकल्पनांवरच कोश काढा. मीच एकदा त्यांना सुलभीकरणाच्या शापातून सुटकेसाठी उत्तराधुनिकता, उत्तरावासाहतिकता अशा नव्या सिद्धान्तावरच विशेषांक काढायचं आव्हान दिलं. त्यांनी शांतपणे ते स्वीकारीत हात पुढे करीत म्हटलं, ''काढतो, द्या नावं लिहिणाऱ्या लेखकांची. तुमच्या समोर पत्रं पाठवू.'' लवकरच माझा पराभव मी मान्य केला.

वाचकांची नस, आजूबाजूची परिस्थिती आणि व्यवहाराचं पक्कं भान असणारा हा सच्चा वाङ्मय सेवक होता. काही कंपूंनी त्यांना समीक्षक नव्हे, तर व्यापारी पुस्तक परिचय करून देणारा म्हणून हिणवलं; पण माझ्यासारख्या दूरदूरच्या एकांड्या शिलेदारांना सावली देणारा कर्मवीर अण्णांच्या सारखाच हा छोटा वटवृक्ष होता, याची साक्ष मला त्यांच्या

अमृतमहोत्सवी वर्षात मेहता प्रकाशनाने पुण्यात घेतलेल्या सत्कार सोहळ्याला जमलेल्या मोठ्या गर्दीने पटवली होती. वक्त्यांच्या यादीत माझं नाव होतं. मराठी साचेबद्ध भाषणांत जान भरण्यासाठी मी इंग्रजीत बोलायचं ठरवलं. त्याआधी त्यांच्या बालसाहित्य, अनुवाद वगैरे साहित्य सेवेसंदर्भात लेखही माझ्याकडून सातारकर कार्यकर्त्यांनी लिहून घेतला होता. मी मुद्दाम पुरावा म्हणून एक पोस्टकार्ड खिशात टाकून गेलो. ती भाषणाची तयारीच होती. अध्यक्ष नगरचे नेते गडाख होते. मी एकटा पाटील. दुसरा थोर पाटील हजर नव्हता. 'एका व्यासपीठावर महाराष्ट्रात दोन पाटील सध्या बसत नाहीत म्हणे. मी गोव्यातून आलोय हे माझे भाग्य.' हा पहिलाच अहेर इंग्रजी असूनही टाळ्या घेणारा ठरला. मग सातारा डिस्ट्रिक्ट फाकडू, श्रमयोजनेतील शिक्षणाला झालेला सारडा टच असा संदर्भ देत मी ते कार्ड खिशातून काढलं.

''हे कार्ड पाहा. शंकर सारडांनी ते 'ललित'चे संपादक असताना मला गोव्यात पाठवलं होतं. 'मराठी साहित्याचा तुलनात्मक अभ्यास : काही नवे सिद्धान्त' हा लेख त्यांच्याकडे पाठवला होता. तेव्हा थेट 'साभार परत' न पाठवता कळवलेला हा निर्णय मुद्दाम वाचून दाखवतो :

'प्रिय आनंद पाटील,

स. न. वि. वि.

तुमचा लेख मिळाला. एकदा नव्हे दोनदा वाचला. काहीही कळले नाही. आता मी तो परत पाठवत नाही. श्रीकृष्णालाच कळवलेय. हा लेख नीट समजून घेण्यासाठी दिव्य चष्मा कृपया पाठवावा... म्हणजे मी तो छापेन!''

त्या दिव्य दृष्टीच्या पवित्र स्मृतीसाठी ही शब्दांजली.

**– प्रा. डॉ. आनंद पाटील**

(माजी इंग्रजी विभाग प्रमुख, गोवा विद्यापीठ)

# शंकर सारडा यांचे साहित्यिक योगदान

**संपादक**

१९८८-९२ महाराष्ट्र साहित्य पत्रिका
१९९३-९४ ललित,
कार्यकारी संपादक
१९९५-९७ महाराष्ट्र साहित्य पत्रिका
१९९९-२००० दै. देशदूत, पुणे
२००१-२००३ लोकमत
रविवार पुरवणी
१९९६पासून मेहता मराठी ग्रंथजगत
- कार्यकारी संपादक

**अधिवेशन आयोजन**


कार्याध्यक्ष : महाबळेश्वर विभागीय साहित्य संमेलन, १९७०
स्वागताध्यक्ष : महाराष्ट्र मुद्रण परिषद २३वे अधिवेशन, १९७३
स्वागताध्यक्ष : मराठी प्रकाशक परिषद १९८७
कार्याध्यक्ष : मुद्रण परिषद अधिवेशन ३५वे, १९८९
६६वे अ. भा. मराठी साहित्य संमेलन, सातारा

**बालवाङ्मय**


चतुर चंपा -१९५०
मधुमुरली - १९५२
दु. आ. १९९३
राणीपरीची कृपा - १९५३
लवंगी मिरच्या - १९५३
जय भोलानाथ -१९५३
बोलके कमळ - १९५३
झिपऱ्या आणि रत्नी - १९६०
महाराष्ट्र राज्य पुरस्कार.
गुराख्याचा पोर - १९६३
चंद्रपरी आणि सोनसखा - १९६७
राक्षसाने उचलली टेकडी १९९१
नंदनवनाची फेरी - १९९१
मला मोठ्ठं व्हायचंय - १९९३
देवदूताचं दु:ख - १९९३
सोन्याच्या टेकडीचा शोध - १९९३
जादूमंतर छू - १९९३
शर्थ पराक्रमाची - १९९३
मर्कटराजाच्या लीला -१९९४
मांत्रिकाची जिरली मस्ती - १९९४
पऱ्यांची सर्कस - १९९६

**समीक्षा व इतर**

काही पुस्तके, काही लेखक १९६५
गुलमोहोर १९७७.
पुस्तकांचं जग १९९२
दूरदेशचे प्रतिभावंत १९९२
ग्रंथविशेष १९९२
ग्रंथ चैतन्य १९९३






# द म्यूट् ॲंक्लिट्

**राधिका नाथन** । अनुवाद : **माधुरी परांजपे**

*हिंदुस्थानातील अठराव्या शतकाचा काळ. म्हैसूरच्या राजाच्या छत्रछायेत वाढलेल्या आणि हिंदुस्थानाविषयी कमालीचा जिव्हाळा असणाऱ्या उमा ब्रुकला एका ब्रिटिश कॅप्टनशी विवाह करावा लागतो आणि एका नाट्याची सुरुवात होते. एका ऐतिहासिक पैंजणाचा रहस्यमय प्रवास आणि हळुवार फुलत जाणारं रोमांचक प्रेम यांची अलवार गुंफण असलेली विलक्षण प्रेमकथा..*

**कथानकाचा कालखंड :** अठराव्या शतकाचे नव्वदीचे दशक

**कथानकाची पार्श्वभूमी :**

टिपू सुलतान आणि इंग्रज यांच्यामधील युद्ध ऐन भरात आले होते. दक्षिण भारतातील लहान लहान संस्थाने युद्धात भरडली जात होती. मदुराई हे त्यापैकी एक संस्थान. इंग्रज सैन्य कॅप्टन ॲश्टन ट्रेव्हेलियनच्या नेतृत्वाखाली मदुराईच्या सैन्याला वेढा देऊन बसले होते. मदुराईचे महाराज नेटाने किल्ला लढवत होते. इंग्रजांनी त्यांची रसद आणि पाणी तोडले होते. इंग्रजांकडे अद्ययावत तोफा आणि बंदुका होत्या. महाराजांकडे क्षेपणास्त्रे होती; परंतु ती वापरण्याचे प्रशिक्षण त्यांच्या सैन्याला मिळाले नव्हते. अशा परिस्थितीत किल्ल्याचे संरक्षण करणे महाराजांपुढे मोठे आव्हान होते.

**पात्र परिचय :**

महाराज : मुदराईचे संस्थानिक. शांत, धीरगंभीर, विवेकशील वृत्तीचे शासक.

**युवराज :** महाराजांचे चिरंजीव. समज, विवेक आणि बुद्धिचातुर्याचा अभाव असणारे. महाराजांच्या मनात बहिणीच्या अनाथ मुलीविषयी– उमाविषयी– अत्यंत हळवा कोपरा आहे. या कारणामुळे युवराजांना उमाबद्दल द्वेष आणि असूया वाटते.

**उमा :** कादंबरीची नायिका. महाराजांची बहीण मीना आणि तिचा इंग्रज प्रियकर वॉरेन यांची कन्या. उमाने आपल्या आई-वडिलांना कधीच पाहिलेले नव्हते. वडील परागंदा झालेले असत. आपल्या जन्माचे रहस्य समजल्यावर उमा पक्की इंग्रजद्वेष्टी होते. संस्कार आणि संगोपनाने ती पूर्णपणे भारतीय, तमिळ आहे.

**वॉरेन :** एक इंग्रज सैनिक आणि उमाचा परागंदा झालेला बाप.

**मि. ब्रुक :** महाराजांचे इंग्रज स्नेही. इंग्रज बापाचे रंगरूप घेऊन जन्माला आलेल्या, गडद निळ्या डोळ्यांच्या, हस्तिदंती कांतीच्या आणि सोनेरी केसांच्या उमाला ज्यांनी आपली मुलगी मानले आहे. त्या निमित्ताने महाराजांनी तीन वर्षांच्या छोट्या उमाला तिच्या आईच्या मृत्युपश्चात राजवाड्यात आणले.

**कॅप्टन ॲश्टन ट्रेव्हेलियन :** कादंबरीचा नायक लंडनच्या उमराव

घराण्यातला. अर्ल ऑफ सेव्हेर्नचे दुसरे अपत्य असल्यामुळे वारसाहक्कातून बेदखल झालेला. पैसे मिळविण्यासाठी इंग्रज सैन्यात भरती होऊन हिंदुस्थानात येतो, ऐशआरामाचे जीवन जगलेला, वंचित घटकांविषयी बेपर्वाई बाळगणारा, सामाजिक बांधिलकी न मानणारा, परंतु शूर, धाडसी, देखणा सैनिक.

**कथानक :**

मदुराईच्या किल्ल्याला आठवडाभर वेढा देऊन बसलेल्या ॲश्टनला किल्ला काबीज करण्यात अपयश आलेले असते. अपरिचित भूप्रदेश, अगम्य स्थानिक भाषा आणि दक्षिण भारतातील असह्य उकाडा यामुळे तो जेरीस आलेला असतो. किल्ल्यात प्रवेश करण्यासाठी किल्ल्यातून निघालेला कथित, गुप्त भुयारी मार्ग शोधणे हा एकमेव पर्याय त्याच्याजवळ असतो. त्या मार्गाचा शोध घेत असताना एका अत्यंत नाट्यमय प्रसंगात कॅप्टनची मुलाकात उमा ब्रुकशी होते. कनवाळू उमा एका आजारी सेवकासाठी मंदिरातून तीर्थ आणण्यासाठी भुयारी मार्गातून किल्ल्याबाहेर आलेली असते कुणालाही न सांगता. तीर्थ घेऊन परतताना भुयारी मार्गाच्या प्रवेशद्वाराशी तिच्या मागावर असणाऱ्या युवराजांशी तिची गाठ पडते. तिच्यावर प्रचंड संतापलेले युवराज तिला सणसणीत चपराक मारून, फरपटत भुयाराकडे घेऊन जातात. हा प्रसंग घटनास्थळीच लपून बसलेला ॲश्टन बघतो. एक सुंदर, इंग्रज युवती एका रानटी स्थानिक माणसाच्या तावडीत सापडली आहे एवढेच त्याला कळते. ते कोण आहेत हे त्याला माहीत नसते. तिला सोडवण्यासाठी अचानक प्रकट होऊन युवराजांवर हल्ला करून त्यांना जखमी करतो. तेव्हा उमा त्याला शत्रू समजून तिला अवगत असलेल्या वर्मन या विद्येचा प्रयोग करून हाताने ॲश्टनच्या वर्मावर प्रहार करून त्याला बेशुद्ध करते. त्याला ते किल्ल्यात घेऊन येतात. आता तो महाराजांचा कैदी असतो.

शत्रू सैन्यावर किल्ल्यावरून दुर्बिणीने टेहळणी करताना महाराजांनी आणि उमाने अनेक वेळा कॅप्टनचे निरीक्षण केलेले असते. त्याचे शौर्य, कौशल्य, देखणे रूप यांचा महाराजांवर प्रभाव पडलेला असतो. उमासाठी त्यांना तो योग्य वर वाटतो. मि. ब्रुकचे निधन झाल्यामुळे उमाच्या जबाबदारीतून त्यांना मुक्त व्हायचे असते. ते कॅप्टनसमोर एक प्रस्ताव

ठेवतात. त्याने उमाशी विवाह करावा व उभयपक्षी फायद्याचा तह करावा; न पेक्षा किल्ल्यावरील अंधारकोठडीत पुढील आयुष्य व्यतीत करावे. ॲश्टनचा निरुपाय होतो. विवाहबंधनात न पडता मुक्त, स्वतंत्र आयुष्य जगण्याचा त्याचा निर्धार असतो. उमा तर हतबुद्ध होऊन साफ नकार देते; परंतु महाराजांच्या प्रेमाखातर अत्यंत नाखुशीने विवाहाला तयार होते.

विवाहानंतर ती ॲश्टनसह मद्रासच्या सेंट जॉर्ज किल्ल्यात राहावयास येते. परस्पर अविश्वास, पूर्वग्रह आणि संशय या भावनांच्या पायावर त्यांचे वैवाहिक जीवन सुरू होते. थोड्याच दिवसांत ॲश्टनला युद्धावर जावे लागते. जाण्यापूर्वी त्यांच्यात एक अत्यंत अप्रिय, अतिप्रसंग घडतो, ज्यामुळे उमा हादरून जाते व स्थितप्रज्ञ बुद्धीचा ॲश्टन विचलित होतो. त्याची अनुपस्थिती तिला सतत जाणवते. उमासाठी आपण जगायला हवे, असे युद्धभूमीवर ॲश्टनला वाटत राहते. दोघांमध्ये पत्रव्यवहार सुरू होतो, तणाव निवळू लागतो.

युद्धात विजय मिळवून परत आल्यावर त्याला लंडनला जाण्याचे आदेश मिळतात. उमा लंडनला जायला तयार होईल का याबाबत तो साशंक असतो; परंतु ॲश्टनविषयी तिच्या मनात उमलणाऱ्या प्रेमभावनांचा, मनाविरुद्ध का होईना, मनोमन स्वीकार करत उमा सहमती दर्शवते. लंडनला ती आपल्या जन्मदात्याचा शोध घेण्याचा प्रयत्न करते. ॲश्टन तिला या कामात मदत करतो. दोघांमध्ये सौहार्दाचे वातावरण निर्माण होते; परंतु अजून प्रेमाचे कबुलीजबाब दिले, घेतलेले नसतात. कादंबरीच्या शेवटी घडणाऱ्या एका अकल्पित घटनेने भारावून जाऊन परस्परांवरील प्रेमावर शिक्कामोर्तब होते. महाराजांनी ॲश्टनवर दाखविलेला विश्वास सार्थकी लागतो आणि उमाच्या पाठीशी असणारे महाराजांचे आशीर्वाद फळतात.

**उप-कथानक :**

उमाला तिच्या आईकडून मिळालेल्या, तिच्या वडिलांच्या एका अमानत वस्तूचे लोखंडाचे, ओबडधोबड दिसणारे पायात घालायचे जाडजूड कडे. कड्याच्या पोकळीत म्हैसूरच्या युद्धात टिपूच्या सैन्याने वापरलेल्या, इंग्रजांना अपरिचित अशा क्षेपणास्त्रांच्या निर्मितीचे साद्यंत विवरण असते. उमाच्या जन्मदात्याने, वॉरेनने, ही अत्यंत गोपनीय माहिती मोठ्या हिकमतीने


मिळवलेली असते. ती माहिती मोठ्या घबाडाच्या बदल्यात ब्रिटिश सरकारला विकण्याचा त्याचा इरादा असतो. कड्याचे गुपित उमाच्या आईला समजताच, ती वॉरेनचा त्याग करून पलायन करते. तिच्याकडे असलेले कडे वॉरेनला परत करणे देशद्रोह ठरला असता. दोघांच्या मृत्यूमुळे कड्याचे रहस्य गुलदस्तात राहते; परंतु एका फ्रेंच माणसाला त्याचा सुगावा लागलेला असतो. ते हस्तगत करण्यासाठी उमावर हल्ले होतात, तिच्या अपहरणाचे प्रयत्न होतात. बंदुकीच्या धाकावर ते मिळविण्यासाठी आलेल्या एका वेषांतरित, मूळच्या फ्रेंच नागरिक असलेल्या स्त्रीचा– त्या फ्रेंच माणसाच्या मुलीचा बेत ॲश्टन उधळून लावतो. तिच्याच तोंडून त्या बेढब, न वाजणाऱ्या कड्याचे रहस्य उलगडते. म्हणून ‘द म्यूट् अँक्लिट्’ हे शीर्षक लेखिकेने दिलेले आहे.



## नवीन सुधारित आवृत्ती

# महापर्व

### स. शं. देसाई





आढ्यतेखोर औरंगजेबाला दख्खन मोहिमेत मराठ्यांना चिरडणं फार सोपं वाटत होतं. पण संताजी, धनाजी, राजाराम महाराज, राणी ताराबाई आणि स्वामीनिष्ठ मावळ्यांनी स्वराज्य रक्षणाची धुरा समर्थपणे सांभाळली. या झळाळत्या महापर्वाचं देदीप्यमान दर्शन घडवणारी ऐतिहासिक कादंबरी.

**किंमत : ४५०/-रु. । पोस्टेज ५०/-रु.। ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

# अखेरची लढाई


### स. शं. देसाई




सवाई माधवराव पेशवे यांच्याप्रति असलेल्या नाना फडणीसांच्या असाधारण निष्ठेची गाथा.. पेशवाई अस्तंगत होऊ नये म्हणून केलेल्या प्रयत्नांची स्फूर्तिदायक कथा.

**किंमत : २४०/-रु. । पोस्टेज ५०/-रु.। ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

**पुस्तक परिचय**




# फॅक्टरी गर्ल्स

**लेस्ली टी. छांग** । अनुवाद : **गौरी देशपांडे**

*चीन म्हणजे १३ कोटी स्थलांतरित कामगारांचं वसतिस्थान. त्यातले सगळेच तिशीच्या आतले. अशाच भविष्याची स्वप्नं घेऊन तोंगकुआनला आलेल्या दोन बहिणींची ही गोष्ट. स्वस्त चिनी मालाच्या निर्मितीसाठी होणाऱ्या कामगारांच्या शोषणाचा भयावह चेहरा उघड करणारी सत्यकथा.*

मूळच्या चीनच्या असलेल्या आणि अमेरिकावासी छांग यांनी तोंगकुआन या

औद्योगिक शहरातल्या अनेक तरुणींच्या जीवनाचा वेध घेत स्थलांतरितांचं अनुभवविश्व चितारलं आहे.

मिन आणि छुनमिंग चीनमधल्या स्थलांतरित कामगारांच्या प्रचंड लोकसंख्येतल्या प्रतिनिधी. त्यांचा संघर्ष आणि जीवन त्यांच्या देशातल्या आजच्या स्थितीचं सूचक होतं. आणि लेखिकेच्या कुटुंबाला अभिप्रेत असलेल्या चीनचंही. कोणताही वर्ग असो आणि कोणताही काळ, ही सगळी कहाणी चीनचीच आहे. घर सोडायचं, प्रचंड कष्ट करायचे आणि नवीन आयुष्य घडवायचं. अनेकांनी अडथळ्यांची शर्यत पार करत हे लक्ष्य साध्य केलं आहे. पण, कदाचित ही आव्हानं शतकापूर्वी अमेरिकेत वास्तव्यास गेलेल्या लोकांना तोंड द्याव्या लागलेल्या भयानक परिस्थितीपेक्षा जहाल नसावीत.

यशस्वी होवो किंवा न होवो, स्थलांतरामुळे नशीब बदलतं हे नक्की. स्थलांतरित मंडळींपैकी बहुतेकसे पुन्हा शेतीकडे वळत नाहीत, असं त्यांच्याविषयी नुकत्याच करण्यात आलेल्या एका अभ्यासातून स्पष्ट झालंय. ज्यांचं सगळं चांगलं सुरू असतं ते त्या संबंधित शहरात घर घेतात आणि तिथेच स्थायिक होतात. बाकीचे त्यांच्या गावाजवळ असलेल्या एखाद्या लहान-मोठ्या शहरात जातात आणि एखादं दुकान, रेस्तराँ सुरू करतात किंवा हेअरड्रेसिंग सलून, शिवणकाम असा लहानसा व्यवसाय सुरू करतात. या व्यवसायांमध्ये, स्थलांतर करून माघारी आलेल्या लोकांना रोजगार मिळतो. कधीही गावाबाहेर न गेलेल्या लोकांपेक्षा पूर्वी स्थलांतराचा अनुभव घेतलेल्यांची क्षमता अधिक असते.

कारखान्यातल्या या मुलींचं विश्व कळल्यानंतर या मुली कमालीची जोखीम पत्करतात, अप्रामाणिक आणि भ्रष्ट लोकांमध्ये वावरत असतात, असं लक्षात येतं. त्यांच्या काही शोकांतिकाही असतात- स्वप्न पूर्ण करण्यासाठी उपयोगी ठरलेला त्यांचा निर्भयपणा काही वेळा त्यांच्या अस्तालाही कारणीभूत ठरला आहे. मिननं तिच्या आयुष्याचे काही महत्त्वाचे निर्णय चुटकीसरशी घेतले; छुनमिंगनं समोर येणाऱ्या प्रत्येक छंदाला आपलंसं केलं. लिउ यिश्यीलाला ज्या पद्धतीनं इंग्रजी सुधारायचं होतं, त्यानुसार सुधारणा करण्यासाठी तिनं वेग धरला. पाश्चात्त्य जगाविषयीही त्यांना कमालीची उत्सुकता होती. अमेरिकन मंडळी कसं खातात, डेटिंग कसं

करतात, त्यांची लग्नं कशी होतात, मुलांना कसं वाढवतात आणि पैसे कसे कमावतात, असं सगळं जाणून घ्यायची इच्छा त्यांना असायची. लेखिका त्यांच्याविषयी बोलत असताना त्यांना समाधान वाटायचं. त्यांच्या संघर्षाविषयी कुणाला तरी काळजी आहे, माहिती आहे; पण त्या काळात स्थलांतरित मुलींनी कधीही त्यांची मदत मागितली नाही. सल्लाही फार क्वचित विचारला असेल. आयुष्याचा सामना त्यांना एकटीलाच करायला आवडायचं.

लेखिका काम करत होती त्या 'दी वॉल स्ट्रीट जर्नल'सह अन्य परदेशी माध्यमांनी कारखान्यांतल्या भयावह परिस्थितीविषयीच्या केलेल्या वृत्तांकनाचा कल, 'लोकांना फारसा आर्थिक मोबदला मिळत नसतानाही उतावळेपणे केलेली कृती म्हणजे स्थलांतर,' असं चित्र निर्माण करण्याकडे होता. वयाच्या अवघ्या सोळाव्या वर्षी आपलं गाव सोडायचं, कोणीही ओळखीचं नसलेल्या शहरात जायचं, असेम्ब्ली लाइनवर काम करायचं, पहिल्यांदाच पैसे कमवायचे, वाटेल त्यासोबत भटकायचं... हे सगळं कसं होत असेल? कुटुंबासोबतची नात्याची वीण कशी बदलत असेल? मैत्रीमध्ये काय बदल होत असतील? जगाकडे पाहण्याचा दृष्टिकोन कसा बदलत असेल? या सगळ्या प्रश्नांची उत्तरं मिळवण्याची उत्सुकता लेखिकेस होती.

स्थलांतरितांमधील काही मुलं-मुली कुटुंब जगविण्यासाठी या क्लब विश्वातही शिरतात. सिल्व्हरवर्ल्ड हॉटेलमधल्या क्लबमधील कराओके विश्वात मामी सर्वोच्च स्थानी होती. शरीरसंबंधांची इच्छा असलेल्या पुरुषांबरोबर मुली ठरवून देण्याचं काम ती करायची. प्रत्येक मुलीच्या उत्पन्नात मामीचा साधारण १५ टक्के हिस्सा असायचा. मामी चांगली असेल तर या मुलींची काळजीही घ्यायची. तिच्यावर त्यांची निष्ठाही जडायची. ती एक क्लब बदलून दुसऱ्या क्लबमध्ये गेली तर मुलीही तिच्यामागून तिथे जायच्या.

कराओके खोल्यांमध्ये दोन प्रकारच्या स्त्रिया काम करायच्या. 'डीजे' खोल्यांचे व्यवस्थापन करणे, मद्य आणि खाद्य पदार्थ देणे, ग्राहकांना गाणी निवडण्यासाठी मदत करणे, अशी कामं करायच्या. ग्राहकांसोबत मद्य घेणाऱ्या महिलांना 'चुओथाय श्याओच्यीए' म्हटलं जायचं. श्याओच्यीए अनेकदा ग्राहकांसोबत संभोग करायच्या. आणि काही डीजेसुद्धा. डीजेंना त्यांच्या उत्पन्नातला हिस्सा मामीला द्यावा लागायचा नाही; पण त्यांना दर

महिन्याला विशिष्ट संख्येने ग्राहक तिथे आणावे लागायचे किंवा क्लबला पैसे द्यावे लागायचे. अनेक क्लब त्यांच्याकडच्या खोल्यांच्या संख्येपेक्षा जास्त डीजे घ्यायचे. ग्राहकांना जास्तीत जास्त खुश करण्यासाठी आणि क्लबला भरपूर पैसा मिळवून देण्यासाठी त्यांच्यामध्ये चढाओढ लागलेली असायची.

चिनी महिलांना तोंड द्यावं लागणाऱ्या बदलांचा, आव्हानांचा विचार करता, चिनी महिला खूप कणखर असल्याचं दिसतं.

या स्थलांतरितांच्या आयुष्याचा वेध घेतानाच बरोबरीने लेखिकेच्या स्वतःच्या कुटुंबाच्या स्थलांतराच्या कहाणीचाही वेध घेणे चालू होतेच.

तिच्या आजोबांनीही तरुण असताना घर सोडलं. एकदा बीजिंगला जायला, मग अमेरिकेला जायला. आधी ते अभ्यासासाठी घरून बाहेर पडले, नंतर देशसेवा करण्यासाठी घरापासून दुरावले. ते परकीय वातावरणात राहिले. त्यांचं लक्ष्य निश्चित करण्यासाठी भरपूर संघर्ष केला. नेहमीच त्यांना प्रचंड कष्ट उपसावे लागले. कर्तव्यनिष्ठतेमुळेच ते फुशुन खाणीकडे ओढले गेले, धोक्याच्या सूचना कितीही दिसत होत्या तरीही! हिवाळ्यातल्या शेवटच्या रात्री, ते ज्या ट्रेनमधून प्रवास करत होते, त्याच ट्रेनमध्ये काही सशस्त्र पुरुष चढले. त्यांनी संगिनीने त्यांच्यावर हल्ला चढवला. त्यांना भोसकलं. त्यांचं सगळं शिक्षण, सगळे प्रयत्न एका क्षणात होत्याचे नव्हते झाले. अशा धारदार शस्त्रांपुढे व्यक्तीचा आदर्शवाद निष्प्रभ ठरतो. माझ्या आजोबांच्या मृत्यूनंतर काही वर्षांनी, त्यांच्या स्वप्नातल्या चीनचं आश्वासनही मरण पावलं.

ज्या प्रकारे सगळ्या घडामोडी घडल्याचं समोर आलं, त्यातून हा अपघात असेल, असं वाटत नव्हतं. माझ्या आजोबांची रोजनिशी वाचल्यानंतर किंवा गावातल्या लग्नामध्ये मिन आणि तिच्या बहिणीवर ज्या प्रकारे जमाव तुटून पडला, त्यातून चीनमध्ये काय चुकतंय ते सारखं अधोरेखित होत असल्याचं मला जाणवलं. कुटुंब आणि देशाचं दडपण जबरदस्त होतं. यामुळेच असंख्य लोक अशा जीवनात ढकलले गेले, जे त्यांनी अन्यथा कधीच निवडलं नसतं. देशासाठी काहीतरी करायचं, हा मुद्दा कळीचा नसता तर लेखिकेचे आजोबा कधीही खाणकाम अभियंते बनले नसते आणि ते फुशुन खाणीतही कधी गेले नसते; पण ते चिनी असल्याचं दडपण घेऊन जन्माला आले होते. त्या दबावामुळेच त्यांचं आयुष्य अश

प्रकारे घडलं. याच कारणामुळे, सन १९४८ मधल्या शरद ऋतूत लिच्याओ आणि चाओ होंगची जायचे थांबले. याच कारणामुळे लेखिकेच्या वडिलांनी अनेक भावना दाबून ठेवल्या होत्या.

लेखिकेने स्थलांतरितांचा अभ्यास करतानाच आपल्या कुटुंबाचा इतिहास खणून काढायचा प्रयत्नही सुरू केला.

लेखिका सांगते, ''माझ्या कुटुंबाची कहाणी जाणल्यानंतर, दक्षिणेकडच्या शहरांतल्या कारखान्यांकडे पाहण्याचा माझा दृष्टिकोनच बदलून गेला. मिन आणि छुनमिंग वावरत असलेल्या स्थलांतरितांच्या विश्वातल्या असंख्य गोष्टी आवडणार नाहीत, अशा होत्या. जसं की, भौतिकवाद, भ्रष्टाचार, दररोजच्या संघर्षातला निकृष्टपणा; पण आता तुमचं गाव सोडण्याची, तुमचं नशीब बदलण्याची संधी निर्माण झाली होती. वेगळ्या जीवनाची स्वप्नं बघणं आणि ती प्रत्यक्षात आणणं शक्य होत होतं. माझ्या आजोबांनी जो जीवनप्रवास करायचं धाडस केलं, ते आता हे लाखो स्थलांतरित दररोज करत होते. या तरुणांनी घरं सोडली, ते अनोळखी भूमीमध्ये गेले, त्यांनी कठोर परिश्रम केले; पण आजकाल, या सगळ्यामागचं उद्दिष्ट चीनचं नशीब बदलणं हा नव्हता; त्यांना फक्त स्वतःच्या नशिबाची चिंता होती. त्यांनी स्वतःचे निर्णय स्वतः घेतले. घरातल्या मोठ्या माणसांच्या दबावाला बळी पडून नाही. हे विश्व वाईट असलं तरी किमान त्यांनी ते स्वतः निवडलेलं होतं.

''कदाचित, एकविसाव्या शतकात चीनमध्ये इतकं भयानक चुकीचं काहीतरी घडलं की लोकांना नव्यानं सुरुवात करावी लागली. या वेळी ही नवी सुरुवात व्यक्तिकेंद्रित होती. कुटुंब, इतिहास, देश यांचं दडपण झुगारणारी होती. दीर्घ काळ मी तोंगकुआनकडे भूतकाळ नसलेलं शहर म्हणून पाहत होते; पण माझा हा समज चुकीचा असल्याचं मला जाणवलं.''


किरकोळ शेतकरी म्हणून जगण्यापेक्षा शहरात नशीब आजमावण्याच्या विचारानं लक्षावधी लोक स्थलांतरित होत असल्याने चीनमध्ये जवळजवळ पाव शतक स्थलांतर सुरूच आहे. जोपर्यंत हा पर्याय निवडला जाणार आहे तोपर्यंत या मुलींनी केलं त्याप्रमाणे, स्थलांतरित मंडळी आपल्या नशिबाचे फासे अनुकूल पडतात का ते पाहण्यासाठी गावांतून बाहेर पडणार आहेत.

## नवीन सुधारित आवृत्ती

# गहाण पडलेली टेकडी

**मारिजा स्रेस**

अनुवाद : **अंजनी नरवणे**




गुजरातमधील साबरकांठातल्या आदिवासी स्त्रियांच्या या कहाण्या..त्यांच्यावर झालेल्या अन्यायाच्या भीषण चित्रांबरोबरच, स्वतःच्या स्वाभिमानाच्या बळावर त्यांनी नव्यानं उभारलेल्या आयुष्याचं दर्शन घडविणाऱ्या विलक्षण सत्यकथा...


**किंमत : २२०/-रु. । पोस्टेज ५०/-रु.। ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

# द पिक्चर ऑफ डोरियन ग्रे

**ऑस्कर वाईल्ड**

अनुवाद

**वि. शं. ठकार**




एका निरागस तरुणाला मिळालेलं चिरतारुण्य आणि त्यानं स्वतःच्या हातानं करून घेतलेलं आत्मिक अधःपतन. डोरियनला चिरतरुण करण्याचं वरदान देणाऱ्या ऑस्कर वाईल्ड यांची एका शतकाहून अधिक काळ जगभरातल्या वाचकांना भुरळ पाडणारी अमेरिकन क्लासिक्स कादंबरी...

**किंमत : २५०/-रु. । पोस्टेज ५०/-रु.। ई-बुक स्वरूपात उपलब्ध**




# द रेल्वेमॅन

**एरिक लोमॅक्स** । अनुवाद : **उदय बुवा**

■

*दुसऱ्या महायुद्धात जपानी सैनिकांच्या तावडीत सापडलेल्या मित्र राष्ट्रांच्या सैनिकांच्या अनन्वित छळाचं, दास्यत्वाचं आणि लाचारीचं मूर्तिमंत उदाहरण म्हणजे एरिक लोमॅक्स. त्याच्या अंतर्मनात उच्छाद मांडणाऱ्या पाशवी सैनिकांपैकी एकाला तो तब्बल पन्नास वर्षांनी भेटला आणि त्याला आपल्या छळाचा जाब विचारता आला. एका असीम धैर्याचा धगधगता आविष्कार असणारी सत्यकथा...*

दुसऱ्या महायुद्धात मित्र राष्ट्रांतील काही सैनिक जपान्यांच्या तावडीत सापडले... एरिक लोमॅक्स त्यांच्यापैकीच एक...ज़पान्यांनी एरिकसह अन्य युद्धकैद्यांचा अमानुष छळ केला... कानबुरी येथील मुख्य छावणी, औटराम रोड जेल, चांगी तुरुंग अशा तीन ठिकाणी एरिक आणि त्याचे अन्य सहकारी जवळ जवळ तीन वर्षं जपान्यांच्या ताब्यात होते...यांपैकी कानबुरी, औटराम रोड जेल येथे पाशवी मारहाण, अंघोळ-दाढी करण्याची परवानगी न देणे, खायला अपुरे-बेचव अन्न, झोपायला लाकडी फळी, मैला वाहण्यासारखी कामे करायला लागणे असा नानाविध प्रकारे छळ...चांगीच्या तुरुंगात मात्र आजारी कैद्यांना सुखावह वागणूक...त्यामुळे आजारपणाचे सोंग करून एरिकने दोनदा चांगी तुरुंगात मिळवलेला प्रवेश...जेलमधून सुटल्यावरही या छळाच्या जखमांमुळे एरिकच्या वागण्यात झालेला बदल...सुटकेनंतर पन्नास वर्षांनी एका छळकर्त्याशी एरिकची झालेली भेट...अंतर्बाह्य हलवून टाकणारी मनो-शारीरिक वेदनांची आणि एरिकच्या जिजीविषेची गाथा


**TBC-29 Book No. 4**

**नवं कोरं**

# द इनोसंट मॅन

**जॉन ग्रिशॅम**

अनुवाद : **संजय गडकरी**

पोलिसांनी एकांगीपणे केलेल्या घोर, गंभीर आरोपामुळे निरपराध बेसबॉल खेळाडूचे जीवन उद्ध्वस्त झाले त्याची चित्तथरारक सत्यकथा




**किंमत : ५००/-रु. । TBCच्या सभासदांना निम्म्या किमतीत**




# आगमन

**सुनील दांडेकर**

*जारणमारण..करणी..भूतबाधा..बळी देणे..अशा अघोरी विद्येभोवती विणलेल्या कथानकातून गूढ, अज्ञेय विश्वात घेऊन जाणाऱ्या, वाचकाला शेवटपर्यंत खिळवून ठेवणाऱ्या तीन लघुकादंबऱ्यांचा संग्रह...*

'आगमन' हा तीन लघुकादंबऱ्यांचा संग्रह आहे. 'आगमन', 'सावज' आणि 'प्रेषित' अशी या तीन लघुकादंबऱ्यांची शीर्षकं आहेत. या तीनही लघुकादंबऱ्यांचा नायक आहे अविचल. तो पिढीजात श्रीमंत आहे. तो तांत्रिक आहे. त्या

क्षेत्रातील ज्ञान तो कोळून प्यायला आहे; पण त्या ज्ञानाचा उपयोग तो वामपंथीयांच्या तावडीत सापडलेल्या व्यक्तींना सोडविण्यासाठी करत असतो, निरपेक्षपणे.

**आगमन**

श्रीनिवास हा एका छोट्या गावातील मुक्तेश्वराच्या देवळाच्या पुजाऱ्याचा मुलगा. त्याचे वडील एकदा देवळात एका तरुण मुलीची बाधा उतरवत असतात. श्रीनिवास त्यांना मदत करत असतो; पण देव आणि भूत या शक्तींच्या अस्तित्वाविषयी उलटसुलट विचार त्याच्या मनात सुरू असतात आणि त्याच वेळेला नकळत मनातल्या मनात तो भूत या शक्तीला आवाहन करतो. त्यावेळी कुणीतरी म्हणतं, की तुझ्यासमोर ही मुलगी आहे ती तुला घे आणि तिला उपभोग. त्या बदल्यात तुला एक काम करावं लागेल; पण त्याच वेळेस श्रीनिवास भानावर येतो. हे आपल्या मनाचे खेळ आहेत, असं त्याला वाटतं.

त्यानंतर प्रिया नावची तरुण, सुंदर मुलगी त्याला भेटते. तिच्याविषयी त्याच्या मनात इतकं जबरदस्त आकर्षण निर्माण होतं, की त्याच्यात आणि तिच्यात शरीरसंबंध निर्माण होतात. तो व्यसनी होतो. एक दिवस श्रीनिवास प्रियासह शहरात निघून जातो. तिथेही तो ऐशोआरामात बुडालेला असताना हंबीर त्याला भेटतो. हंबीरशी भेट झाल्यावर त्याला कळतं की प्रिया हे त्याच्यावर टाकलं गेलेलं जाळं आहे. प्रियाच्या बदल्यात त्याला एक अघोर मार्गावरचं कृत्य करायचं आहे, ज्या कृत्यात कदाचित श्रीनिवास अघोरपंथीयांच्या देवाचा नैवेद्य होऊ शकतो. अर्थातच तो या गोष्टीला नकार देतो; पण हंबीर आपल्या विकृत शक्तींच्या जोरावर श्रीनिवासला इतकं त्राही भगवान करून सोडतो की श्रीनिवास आत्महत्या करायला निघतो.

त्याच वेळेला योगायोगाने श्रीनिवासची भेट अविचलशी होते. श्रीनिवासची हकिकत ऐकल्यावर तो श्रीनिवासला हंबीरच्या तावडीतून सोडवायचं ठरवतो. काय करतो तो श्रीनिवासला सोडवण्यासाठी?

**सावज**

एकदा अविचलला वीरमगढ नावाच्या गावातून इंदिरा दीक्षित या वृद्ध स्त्रीचा फोन येतो. त्यांच्या नातीला तनयाला बाहेरची बाधा झालेली असते, त्यामुळे ती खूपच विचित्र वागत असते. अनेक उपाय करूनही तिच्यात

काहीच फरक पडत नाही, म्हणून त्यांच्याच गावातील पाठक या दत्तभक्तांच्या सांगण्यावरून त्यांनी अविचलला फोन केलेला असतो. त्यांच्या सांगण्यावरून अविचल वीरमगढला जातो. तनयाला बघितल्यावर तिला झालेली बाधा जबरदस्त असल्याचं त्याच्या लक्षात येतं. शिवाय दीक्षितांचा वाडाच वामपंथाला अनुकूल असल्याचं त्याला कळतं.

इंदिराबाईंचे सासरे वामपंथी होते, हे त्याला इंदिराबाईंकडूनच कळतं. तनयाला बाधेतून बाहेर काढण्याचा विधी अविचल करत असतानाच इंदिराबाई जारण मंत्राद्वारे त्याच्या शरीराचं चलनवलन बंद करतात. अविचल लोळागोळा होऊन पडतो. बेशुद्धीत जाता जाता अविचलच्या लक्षात येतं, की तनयाच्या माध्यमातून इंदिराबाईंनी त्याच्यावर जाळं टाकलं आहे; पण अविचलचा जिवलग मित्र भैरव वीरमगढला पोचतो. इंदिराबाईंच्या धमक्यांना भीक न घालता अविचलला पाठकांच्या दत्ताश्रमात घेऊन येतो. पाठक आणि भैरव अविचलला पूर्वस्थितीत कसे आणतात आणि इंदिराबाईंनी अविचलला सावज का केलेलं असतं?

**प्रेषित**

गुरूंच्या आज्ञेवरून अविचल काही काळासाठी झोपडीत राहायला जातो. तिथे एकदा बंडू नावाचा एक गरीब माणूस त्याच्याकडे येतो आणि कांतिलाल नावाचा एक तांत्रिक त्याच्या बायकोवर नजर ठेवून असल्याचं सांगतो. अविचल कांतिलालला अशा शारीरिक अवस्थेत नेऊन ठेवतो, की तो एकाच जागी बद्ध होतो. त्याला सोडविण्याची विनंती करायला वांचूमाळ नावाचा एक माणूस अविचलकडे येतो.

वांचूमाळ हा एक आदिवासी माणूस असतो. त्याने परदेशातील विद्यापीठातून गणितात पीएच.डी. ही पदवी मिळवलेली असते. त्या पदवीचा उपयोग समाजाचा धर्मग्लानी सूचकांक काढण्यासाठी तो करतो. त्याच्या मते आता परमेश्वराने अवतार घेण्याची वाट पाहण्यापेक्षा कंस, रावणासारखी मदांध व्यक्ती जन्माला यावी म्हणून प्रयत्न केले पाहिजेत. त्याचं हे तत्त्वज्ञान अविचलला फारसं रुचत नाही. तरी वांचूमाळचा एक प्रस्ताव तो स्वीकारतो.

तो प्रस्ताव असा असतो की, अविचलसह बारा तांत्रिकांना घेऊन वांचूमाळ त्याच्या गावी जाणार असतो; मात्र हा सगळा प्रवास जंगलातून पायी होणार असतो. त्या प्रवासादरम्यान या बाराही जणांचा बाह्य जगाशी काहीच

संपर्क राहणार नसतो; मात्र वांचूमाळ या सगळ्या तांत्रिकांना त्याच्या गावी का घेऊन जातो आहे, याचं कारण त्याने सांगितलेलं नसतं. या बारा जणांमध्ये चार मुलीही असतात. ईश्वरी, अवनी, पौलुमी, सुझन.

जंगलातील प्रवासादरम्यान अवनी व सुझन मृत्यूच्या दाढेत जातात. अविचल, गफूर आणि पौलुमी यांना वेगळं काढलं जातं आणि बाकी लोकांचा वांचूमाळच्या गावी पोचल्यावर बळी दिला जातो. अविचलकडून एक महत्त्वाचं तांत्रिक काम वांचूमाळला करून घ्यायचं असतं. काय असतं ते काम? गफूर आणि पौलुमीकडून वांचूमाळची काय अपेक्षा असते? या तिघांचाही त्याला बळी द्यायचा असतो का?

वरील सर्व घटनांचा तपशील जाणून घेण्यासाठी 'आगमन' वाचलंच पाहिजे.


TBC-29 Book No. 5

**नवं कोरं**

# नेव्हर गो बॅक

**ली चाइल्ड**

अनुवाद : **बाळ भागवत**

नेव्हर गो बॅक- ली चाइल्डची साहसकथा, ज्यात आहेत वेगानं घडणाऱ्या नाट्यमय घटना, ओघवती भाषा आणि अर्थातच जॅक रीचर.




**किंमत : ५५०/-रु. । TBCच्या सभासदांना निम्म्या किमतीत**




# बेशरम

**तसलिमा नासरिन** । अनुवाद : **मंजिरी धामणकर**

*स्थलांतरात होरपळलेला सुरंजन, नियतीच्या तालावर चालत राहणारी किरणमयी, बलात्काराचं जहर पचवणारी माया आणि फिनिक्स भरारी घेणारी करारी जुलेखा या चार पात्रांची गोष्ट सांगता सांगता उलगडत जाणारा एका अराजकाचा पट.. मूलतत्त्ववादाच्या फेऱ्यात अडकलेल्या स्थलांतरितांचं दुःख मांडणाऱ्या, तसलिमा नासरिन यांच्या जगप्रसिद्ध ‘लज्जा’ कादंबरीचा उत्तरार्ध...*

तसलिमा नासरिन यांची ही कादंबरी स्थलांतरितांच्या जीवनाची चित्तरकथा आहे. आपली जन्मभूमी सोडून परक्या मुलखात, जगभरच्या कानाकोपऱ्यांत, वेगवेगळ्या वातावरणात स्वतःला रुजवू पाहणाऱ्यांची ही गोष्ट आहे. अर्थात तसलिमा यांनी स्वतः हे आयुष्य जवळून अनुभवलेले आहे. म्हणूनच स्वतः तसलिमा यांचं जगणंही यात प्रतिबिंबित होत राहतं. त्यांच्या 'लज्जा' कादंबरीमुळे त्यांना कट्टरपंथी लोकांनी देश सोडायला लावला. 'लज्जा'मध्ये अनुभवाला येणाऱ्या प्रसंगांचीच पुढील आवृत्ती या कादंबरीत पाहायला मिळते.

तसलिमा यांनी मोठा काळ देशाबाहेर व्यतीत केला आहे. आपली मुळे उखडली जाण्याची ही वेदना या कादंबरीत प्रकर्षाने येते. कादंबरीची सुरुवातच एका भेटीने होते. 'लज्जा' कादंबरीतील पात्र असणारा सुरंजन लेखिकेला अचानक भेटायला येतो. हा तोच सुरंजन असतो, जो लज्जा कादंबरीच्या केंद्रस्थानी आहे. लेखिका या गोष्टीपासून अनभिज्ञ आहे की सुरंजन आणि त्याचे कुटुंब बांगलादेशातील १९९३मधील सांप्रदायिक दंगलीवेळी स्वतःचा बचाव करत भारतात येण्यात यशस्वी झाले होते. या भेटीत लेखिकेला कळतं की सुरंजनचे वडील सुधामय यांचे निधन झाले आहे, तर त्याची आई आणि बहीण जिवंत आहेत. या भेटीत सुरंजनच्या स्थलांतराची गोष्ट समोर येते. या दोघांच्या संवादातून एकेक धागा उलगडत जातो.

याच धर्तीवर लेखिकेला एकेक पात्र भेटत जाते. आणि त्यांच्या कथा समोर येत जातात. हे पुस्तक कट्टरपंथीयांची बेशरमी वृत्ती अधोरेखित करत त्या विरोधात आवाज उठवण्याच्या संभावनांची चाचपणी करतं; पण हे पुस्तक राजकीय नाही, तर सामाजिक स्तरावरील स्थितीबाबत अधिक निवेदन करतं. लेखिका अर्थात तसलिमा यांना सुरंजन, किरणमयी, माया आणि जुलेखा ही चार पात्रं भेटतात आणि या पात्रांसोबतचा संवाद कादंबरी प्रवाहित करतो.

## पुस्तक परिचय




# शांघायच्या मुली

**लिसा सी** । अनुवाद : **सुनंदा अमरापूरकर**

*शांघायच्या उपवर मुली पर्ल आणि मेला जुगारी बाप डावावर लावतो. सक्तीच्या लग्नामुळे चीनमधून अमेरिकेची वाट पकडताना दोघींची आयुष्यं आव्हानांनी भरून जातात. या स्थलांतरात कधी असूयेची धार तर कधी प्रेमाचा वर्षाव अनुभवत दोघींना जीवन उद्ध्वस्त करणारं गुपित सांभाळावं लागतं. तरी या विलक्षण कादंबरीतल्या शांघायच्या मुली आपली मुळं अखंड जोपासतात.*

आशिया खंडातील चीन येथील शांघाय शहरातील पर्ल चिन व मे या उमलत्या तरुणाईतील दोघी बहिणी जुजबी शिक्षणानंतर कॅलेंडरसाठी जाहिरातीच्या मॉडेल म्हणून काम करत असतात. मध्यमवर्गीय सुखवस्तू घरातील या बहिणींचं आयुष्य रंगीबेरंगी, फुलपाखरी, मौजमजेचं, काळजीमुक्त असं स्वैर उडणारं असं असतं.

मात्र अचानक एक दिवस त्यांचे वडील जाहीर करतात, की जुगारात हरल्याने त्यांना त्यांचं राहतं घर, पैसा, फर्निचर वगैरे सामानाबरोबरच त्यांच्या दोन मुलींनाही विकून भरपाई करावी लागत आहे. त्या दोघी बहिणींना त्यांनी लॉस एंजलिसहून आलेल्या स्थलांतरित लुई नावाच्या मूळ चिनी माणसाच्या दोन मुलांच्या वधू म्हणून विकले आहे. या दोघींचे लग्न त्या मुलांशी लावून लुई आणि कुटुंब या मुलींसाठीची तिकिटे व कागदपत्रे त्यांना देऊन दोन आठवड्यांनी त्यांनी यावे, असे सांगून अमेरिकेत परततो.

हा अचानक झालेला स्थितिपालट या दोघींच्या जीवनाला कलाटणी देणारा ठरतो. हे शक्य नाही असे ठरवून दोघी बहिणी तिकिटे-स्थलांतरितांची कागदपत्रे फेकून देऊन बंड करू पाहतात; पण त्याच वेळेस महायुद्धाचे ढग येतात. जपानी सैन्य शांघायवर बॉम्बहल्ला सुरू करते. या संकटात मुलींचे वडील परागंदा होतात. मुलींनाही आपल्या आईसह घरापासून दूर पलायन करावे लागते. मुलींच्या- पर्ल व मे यांच्या आईने त्या मुलींच्या स्थलांतराविषयीची कागदपत्रं कचऱ्यातून उचलून ठेवलेली असल्यानं, आता लुईकडे अमेरिकेकडे स्थलांतर करणं, हाच एक मार्ग उरतो.

गरजू हातगाडीवाल्याच्या मदतीने कसातरी मजलदरमजल करत त्या पलायनाचा मार्ग स्वीकारतात. सुनसान गावातील झोपडीतून मुक्काम करत गरीब शेतकऱ्यांच्या मदतीनं मार्ग काटतात; परंतु अखेर एका मुक्कामात गुंड आईवर बलात्कार करतात, तेव्हा आईला व धाकट्या बहिणीला वाचवण्यासाठी पर्ल पुढे झाल्याने तीही गुंडांच्या तावडीत सापडते. आईचा मृत्यू होतो; पण गुंड निघून गेल्यावर मे आपल्या बहिणीला कसेतरी हातगाडीवर घालून दवाखान्यात नेते. आता त्या कागदपत्रांच्या साह्याने

अमेरिकेला जाण्यासाठी बोटीवर जाणे, एवढेच त्यांच्या हाती राहते. अतिशय गलिच्छ गर्दीतून, निम्न आर्थिक परिस्थितीतल्या स्त्री-पुरुषांच्या सान्निध्यात बराच प्रवास करावा लागून अखेर चार महिन्यांनी त्या लॉस एंजलिसला आल्या; मात्र वारंवार त्यांचा सर्वांगाने तपास करून, त्यांना माहिती विचारून, त्या कायदेशीररीत्या अमेरिकेत येत आहेत का, याची तपासणी व छळ चालूच असे. खायलाही कदान्नच मिळे. त्यांच्याकडील कागदपत्रांचीही कसून तपासणी केली जाई व वारंवार त्या अमेरिकेत ज्यांच्याकडे जात आहेत त्या लुई कुटुंबाची माहिती विचारली जाई. त्यात तफावत आढळली की त्यांना अडकवून ठेवले जाई. त्या कागदपत्रांचा त्यांनी फारसा गंभीरतेने अभ्यास केला नसल्याने चुका होत. अखेर त्यांना अमेरिकेला उतरू न देता दुसऱ्या बेटावर नेले जाते. त्यातच मे प्रेग्नंट असल्याचे त्या दोघींच्या लक्षात येते.

त्यांना नेलेल्या बेटावरच पूर्ण दिवस भरण्यापूर्वीच बोटीवरच अचानक मे प्रसूत होऊन तिला मुलगी होते. अमेरिकेत प्रवेश देण्याविषयी दोघी बहिणींची चाचपणी, सुनावणी सुरूच असते.

पर्लची आपल्या नवऱ्याबरोबर तो शांघायमध्ये लग्नासाठी आला असता तीन वेळा भेट झाल्याने मुलगी पर्लला झाली, असं दोघी जणी सर्वांना पटवतात. शेवटच्या सुनावणी वेळी सुंदर रेशमी पोशाख घालून, सोबत पिसांची हॅट आणि हातात सुंदर सजवलेलं बाळ घेऊन पर्ल सुनावणीला जाते. 'मे' आणि 'पर्ल' कोचिंग बुकचा चांगला अभ्यास करून जातात. कायदेशीरपणे स्थलांतरित व्यापारी, तरीही अमेरिकन नागरिकाची पत्नी, वगैरे प्रश्नांवर अस्खलित इंग्लिशमध्ये बोलत सर्व प्रश्नांची अचूक उत्तरं अगदी न अडखळता देतात. जॉयमुळे- पर्लच्या मुलीमुळे निर्माण होणाऱ्या कायदेशीर आणि तांत्रिक समस्यांना तोंड दिल्यावर, जवळ जवळ चार महिन्यांपेक्षा जास्त काळानंतर त्यांना अमेरिकेत प्रवेश दिला जातो.

आता छोट्या मुलीसह त्यांचा अमेरिकेतील चायना टाऊनमधील लुई परिवारात प्रवेश होतो. प्रथमतः पर्लला मुलगी झाल्याचं पाहिल्यावर लुई म्हातारा-म्हातारीचा भ्रमनिरास होतो. लुई म्हाताऱ्याचा सर्वांवर- म्हातारी येनयेन, मुलगे सॅम, वर्न आणि आता पर्ल व 'मे' यांच्यावर चांगलाच वचक असतो. तो सांगेल तेच सर्वांना ऐकावे लागते. लुईचे या चायना टाऊनमध्ये छोटे छोटे बरेच उद्योग असतात. हळूहळू या दोघी बहिणी त्यात हातभार

लावायला सुरवात करतात. योग्य संधी मिळताच तेथून पळ काढायचे त्यांच्या मनात असतेच. लुई म्हाताऱ्याने पेपर सन- म्हणजे वारंवार चीनच्या आपल्या गावाकडे जाऊन तेथे आपल्याला मुलगे झाल्याचे दाखवून अनेक मुलांना अमेरिकेत आणलेले असते. हे सर्व 'कागदी मुलगे' त्याच्या निरनिराळ्या व्यवसायांत काम करत असतात. असेच हे बेकायदा चिनी जनतेचे अमेरिकेतील चायना टाऊन वसविलेले असते. हळूहळू पर्ल येनयेन व मुलगी जॉयबरोबर घरात व 'मे' सिनेमात एक्स्ट्रॉ म्हणून काम करते व भाड्याने सामान पुरवण्याच्या, माणसे पुरवण्याच्या व्यवसायात जम बसवते. सॅम व वर्नची वर्तणूक या दोघी बहिणींशी चांगली व जमवून घेणारी असते. काही दिवसांनी त्या कुटुंबाबद्दल पर्ल व 'मे'ला आपलेपणा वाटू लागतो. लुई म्हाताऱ्यावरही त्या आपला प्रभाव पाडू लागतात. अचानक एक दिवस चायना टाऊनला आग लागते व लुईचे बरेचसे उद्योग जळून खाक होतात. पर्ल व 'मे' त्यासाठी कष्ट घेऊन पुन्हा उभारण्यास मदत करतात. नवीन कॅफेही उभारतात. सॅम तेथे मेन कुक म्हणून काम करू लागतो. लुई व सॅमचे काही वेळा टोकाचे मतभेदही होतात. त्या दोघींना कळते, की सॅमही त्यांचा पेपर सनच आहे; कारण लुईचा खरा मुलगा वर्न हा अशक्त व नाजूक प्रकृतीचा असल्याने त्याला जपण्यासाठी लुईने त्याला आपला वारस दाखवला आहे.

वर्नची तब्येत दिवसेंदिवस बिघडत जाते; पण घरी जास्त करून पर्लच असल्याने, तीच त्याची व जॉयची काळजी घेत असते. आता जॉय शाळेत जाऊ लागते. पर्ल पूर्णपणे चिनी रीतिरिवाजाप्रमाणे तिचे पालनपोषण करण्याचा प्रयत्न करते; पण एकीकडे तिला अमेरिकन नागरिकत्व मिळाल्यामुळे तिने अमेरिकेतील मुलांमध्ये मिसळून जावे, असेही वाढविण्याकडे कल होतो. तिकडे शांघायचीही परिस्थिती बिकट झालेली असते. आता कम्युनिझम व माओमुळे चीनमध्ये व इतर देशांत पोलादी पडदा उभा राहतो. चीनमधून बाहेर जाणे व चीनमध्ये जाणे या दोन्ही गोष्टी अडचणीच्या होतात. अमेरिकेतील कोण कोण चीनला मदत करतोय याची दखल घेऊन त्यांची चौकशी करणे व त्यांना अमेरिकेतून हाकलणे सुरू होते. पर्ल व 'मे' यांचं शांघायमध्ये आता कोणीच नसतं; पण अमेरिकेतही लुईच्या कागदी मुलांना शोधून त्यांना त्रास देण्याचे, अमेरिकेतून बाहेर काढण्याचे

प्रयत्न सुरू होतात. जॉयपासून हे सर्व लपविलेले असल्याने तिला आपण मूळ चिनी असल्याने चीनला जावे, कम्युनिझम यांचे आकर्षण वाटते. मध्यंतरीच्या काळात लुई व येनयेनचा मृत्यू झालेला असतो; मात्र लुईच्या कागदी मुलांच्या प्रकरणासाठी बेकायदा चिनी लोकांना येथे आणण्यामुळे सॅम व घरातील सर्वांच्या मागे वारंवार चौकश्यांचा ससेमिरा लागतो. त्यांनी शरणागती पत्करावी, असे दडपण येते. याबद्दल जॉयला काहीच कल्पना नसते. या सगळ्या ताणामुळे सॅम आत्महत्या करतो. वर्नची तब्येतही खूपच बिघडू लागते. यात एकट्या पर्लला सर्वांना सांभाळणे अवघड होऊन बसते. दोघी बहिणींचे एकमेकींवर खूप प्रेम असूनही, परिस्थितीमुळे आतापर्यंत घेतलेले निर्णय (जॉय ही पर्लची मुलगी नसून मेची मुलगी आहे; सॅम कागदी मुलगा आहे, ही रहस्ये जॉयपासून व इतरांपासून जपणे) एकमेकींवर लादल्यासारखे वाटू लागते. सॅमच्या आत्महत्येने पर्ल खूपच दुखावली जाते. एकटी पडते. 'मे'ची मुलगी वाढवून, लुई परिवाराची सर्व देखभाल करून आपल्या हातात काहीच राहिले नाही; मे मात्र बाहेरच मजा करत राहिली; तिच्या अशक्त नवऱ्याचीसुद्धा काळजी आपल्यालाच घ्यावी लागतेय, असं पर्लला वाटत राहतं; तर आपल्या बहिणीने मुलीपासून आपल्याला तोडले व अशक्त नवऱ्यापासून काहीच सुख मिळाले नाही म्हणून मेही दुःखी राहिली. दोघींच्या मध्ये एकमेकींबद्दल कडवटपणा साचला. दोघींचं यावरून जोरात भांडण झाल्यावर जॉयला हे सगळं कळतं व ती घर सोडून निघून जाते.

अचानक दोघींच्या हे लक्षात आल्यावर जॉय कुठे गेली असेल त्यासाठी शोधाशोध केल्यावर त्यांना संशय येतो, की ती शांघायला गेली असावी. तिच्या मैत्रिणीकडून तिला विमानतळावर पाहिल्याचे कळताच पर्ल तिला शोधून परत आणण्यासाठी व शांघाय आता तेथे राहण्यासारखे राहिले नाही, हे पटवण्यासाठी मेला मागे ठेवून शांघायकडे कूच करते.

पर्ल व 'मे'चे शांघायचे तरुणपणातले दिवस, चिनी रीतिरिवाजांविषयीचं परदेशात आल्यावर उफाळून आलेलं प्रेम, ते जपण्यासाठी, तसंच मुलीला घडविण्यासाठीची धडपड; पण तरीही अमेरिकेतील स्वातंत्र्याचे चाखलेले पाणी या सर्व मानसिक कोलाहलातील व्यक्तिचित्रण रंजक, उत्सुकता वाढवणारं आहे.

# नवं कोरं

**TBC-29 Book No. 6**

## अ विचव्हर फुल ऑफ ॲरोज




**किंमत : २५०/-रु.**
**TBCच्या सभासदांना निम्म्या किमतीत**

---

**TBC-30 Book No. 1**

## अ ट्विस्ट इन द टेल




धूर्तपणे रचलेलं कथानक आणि रेशमी शैलीत
वाचकांना गुंगवणाऱ्या मास्टर एंटरटेनर जेफ्री आर्चर
यांच्या उत्कंठावर्धक कथा..

**जेफ्री आर्चर** । अनुवाद : **लीना सोहोनी**

**किंमत : ३००/-रु. । TBCच्या सभासदांना निम्म्या किमतीत**

## पुस्तक परिचय




# प्रिस्क्रिप्शन्स फॉर लिव्हिंग

**बर्नी सिगल** । अनुवाद : **डॉ. अस्मी अच्युते**

*मनमोकळं जगणं शिकवणाऱ्या डॉक्टरनं दिलेलं सुखी जीवनाचं प्रिस्क्रिप्शन..सुखी, सर्जनक्षम आयुष्याचा मागोवा घेणाऱ्या लोकांना अंतर्दृष्टी बहाल करणारं, 'Love, Medicine & Miracles' व 'Peace, Love & Healing' या लोकप्रिय पुस्तकांच्या लेखकाचं नवं पुस्तक...*

# जेफचे शहाणपण

सुखी माणसांना असं काय माहीत असतं जे दुःखी माणसांना माहीत नसतं?

आमच्या घरापासून अर्ध्या मैलावर माझा मुलगा जेफ राहतो. सकाळच्या चालण्यानंतर किंवा सायकलिंगनंतर घरी परतताना बऱ्याचदा मी त्याच्याकडे डोकावतो. त्याच्या स्वयंपाकघरातल्या स्टुलावर बसून आम्ही दोघं आयुष्याच्या व्यावहारिक आणि तात्त्विक बाजूंवर चर्चा करतो. काही दिवसांपूर्वीच आमच्या अशाच विषयांवर भरपूर गप्पा झाल्या आणि जेफने मला माझ्या नवीन लिखाणाविषयी विचारलं.

माझ्या कामात इतका रस घेणारा सुपुत्र पाहून मला आकाश ठेंगणं वाटायला लागलं. असा मुलगा मिळालेला मी किती सुदैवी आहे असे विचार मनात आले. ''होय,'' मी म्हणालो, ''अध्यात्म आणि कठीण परिस्थितीत त्याची आपल्याला होणारी मदत या विषयावर मी एक पुस्तक लिहीत आहे.''

''बरं... मग तुमच्या पुस्तकाला तुम्ही आध्यात्मिक मूर्खपणा म्हणायला हवं,'' तो धाडकन म्हणाला.

जेफकडून घरी येताना मला रोडानी डेंगर्फल्डचं वाक्य आठवतं होतं, 'I don't get no respect.' (मला अनादर कधीच मिळत नाही) रोडानीच्या या तक्रारीत दोनदा नकारात्मकता आहे आणि तुम्ही जरासा विचार केलात आणि ती नकारात्मकता समजावून घेतलीत तर तुम्हाला त्या वाक्याचा खरा अर्थ कळेल. त्याला म्हणायचे आहे की लोकांनी त्याचा अनादर केला असे कधीच होत नाही

– थोडक्यात काय तर त्याचा आदर केला जातो. थोडीतरी आदरपूर्वक वागणूक त्याच्या वाट्याला येते. हेच उदाहरण मलाही लागू पडत होतं. कधी कधी वरकरणी अपमान केल्यासारखं वाटलं तरी त्यामागे अतीव आदराची भावना दडलेली असू शकते. दुसऱ्याला बऱ्याच वेळा टोमणे मारणाऱ्या माझ्या कुटुंबाच्या बाबतीत तर वरचं विधान निश्चितच खरं होतं. स्वतःच्याच विधानांना किंवा लिखाणाला मी फार गंभीरपणे घेऊ नये असं माझी मुलं मला वारंवार सांगायची. मुलांनी मला टोमणे मारणं किंवा सल्ले देणं आमच्या

घरात नवीन नाही. त्यामुळे मी जेफच्या बोलण्याने फारसा दु:खी वगैरे झालो नाही. उलट, त्या बोलण्याने मला विचार करायला प्रवृत्त केलं. यापूर्वी जेफच्या बोलण्यातून मला माझ्या एका पुस्तकाच्या नावाचा साक्षात्कार झाला होता हे आठवलं.

काही वर्षांपूर्वी याच घरात आम्ही असेच दोघ बसलेलो असताना तो मला म्हणाला, तुमच्या पुढच्या पुस्तकाचं नाव तुम्ही 'मनाचा वेडेपणा' 'Out of my mind' असं ठेवा.

आणि तसं का नसावं? त्याला असा बाप मिळाला होता, जो त्याचं वारंवार डोकं खातो, विमानतळावर लहान मुलांसारखा वागतो, लहानासारखे विनोद सांगतो आणि 'प्रेम' वगैरे विषयांवर पुस्तकं लिहितो. पण नंतर मला जाणवलं की त्याने सुचवलेलं शीर्षक अतिशय योग्य आणि समर्पक आहे. आयुष्यातली प्रत्येक गोष्ट, कृती, विचार, भावना आपल्या बुद्धितूनच तर बाहेर आलेल्या असतात. मी नेहमीच म्हणतो की आपल्या भावनांचा जन्म बुद्धितून होतो. या भावनांच्या प्रकारानुरूप एकतर त्या आपल्या शरीराचा ताबा घेऊन त्याचं नुकसान करतात किंवा आपल्याला निरोगी, स्वस्थ राहण्यासाठी शरीराला मदत करतात.

संकटांना आपण किती उत्तम रीतीने सामोरे जाऊ शकतो, आपल्या आयुष्याची गुणवत्ता आपला आनंद किंवा दु:ख हे सारंच आपल्या मनात – डोक्यात काय चालू आहे त्यावर ठरतं / त्यानुसार ठरतं. तर, आमच्या मुलाचं म्हणणं बरोबर होतं. 'मनाचा वेडेपणा' हे शीर्षक छानच होतं, पण आध्यात्मिक मूर्खपणा? हे जरा जास्तच होत होतं. चालत घरापर्यंत येताना मी संपूर्ण वेळ त्यावरच विचार करत होतो. अरेच्चा!

जेफला परत एकदा जमलं होतं. वरकरणी शालजोडीतली ठेवून दिल्यासारखं वाटलं, तरी त्या शीर्षकात मला जो संदेश द्यायचा होता तो जेफने बरोब्बर पकडला होता. आयुष्य हाच एक आध्यात्मिक मूर्खपणा आहे. 'आयुष्य म्हणजे बऱ्या-वाईट गोष्टींचं मिश्रण' असं म्हणालेलं देवाला जास्त आवडलं असतं; पण एकूणात अर्थ तोच.

आपल्या सगळ्यांनाच समस्या असतात; पण त्याच आपल्याला मार्ग दाखवतात, पुढे जायला शिकवतात. संकटांमुळे आयुष्य समृद्ध होतं. ती

समृद्धी अनुभवाची असते, विचारांची असते. संकटे – समस्यांमधूनच अनेक संधी आणि शक्यता निर्माण होतात हे साक्षात्कारी मनुष्य किंवा एक सुखी कुटुंब जाणून असतं.

सुखी कसं व्हावं हे माहीत असलेली माणसं म्हणतात, 'देवा, आम्ही समृद्ध व्हावं म्हणून तू संकटाचं बीज दिलंस, त्याबद्दल आम्ही आभारी आहोत.' दु:खी लोक सततच रडतात, 'देवा, आम्हालाच का तू दु:खं, संकटं देतोस?' मोठाच फरक आहे नाही?

माझ्यापुरतं बोलायचं झालं तर मी म्हणेन, 'देवा, माझ्या शहाण्या मुलाने केलेल्या आदरपूर्वक अपमानाबद्दल मी तुझा आभारी आहे.'

सगळ्या सुखी कुटुंबांमध्ये एक सामान धागा आहे; पण दु:खी कुटुंबं मात्र त्यांच्या स्वत:च्याच वेगवेगळ्या कारणांमुळे दु:खी असतात, असं टॉलस्टॉय म्हणायचा. असं का असेल बरं? सुखी कुटुंबांनी समस्यांपासून पळ काढला नाही तर त्यांना यथाशक्ती तोंड दिलं. त्यांच्यात काहीतरी साम्य आहे; कारण संकटातही आनंदी राहण्याचे फार थोडे मार्ग आहेत. समस्यांना तोंड देण्याचे इतरही उपाय आहेत; पण हे उपाय त्रासदायक आहेत. असे इतके मार्ग आहेत की प्रत्येक दु:खी कुटुंबाला रडत बसायला काही ना काही कारण सापडतंच.

जीवघेण्या आजाराने मरण पावणाऱ्या रुग्णाचा अभ्यास डॉक्टर करतात त्याप्रमाणे सतत दु:खी असणाऱ्या, संकटं ओढवून घेणारे निर्णय घेणाऱ्या कुटुंबाचा अभ्यास करण्यात लेखकांना, कादंबरीकारांना जास्त रस असतो; पण एक अंदर की बात सांगू का? एखादा रुग्ण मृत्युशय्येवर आहे असं तुम्हाला वाटतं आणि त्या आजारातून तो वाचतो, तेव्हा त्या रुग्णाकडून बरंच काही शिकण्यासारखं असतं.

असाध्य वाटणाऱ्या आजारातून वाचलेल्या रुग्णांचा मी एक डॉक्टर म्हणून अभ्यास केला. हे रुग्ण आजाराने ग्रासलेले होते; पण डॉक्टरांच्या आणि त्यांच्या नातेवाइकांच्या जीवनाबद्दलच्या आशा या रुग्णांनी वाढवल्या. चिकित्सेला, उपचारांना, औषधांना सकारात्मक प्रतिसाद दिला. अशा अनेक अपवादात्मक रुग्णांकडे फार कमी आयुष्य उरलं होतं; पण ते रुग्ण जगातील

सर्वांत आनंदी व्यक्ती होते. जर तुम्हाला सुखी, आनंदी व्हायचं असेल तर काही कळीच्या प्रश्नांची उत्तरं द्यावीच लागतील हे त्या रुग्णांना कळलं होतं. कदाचित त्यांचा आजार त्यांचा गुरू बनला होता आणि त्यातूनच आनंदी आयुष्याचं रहस्य त्यांनी शोधून काढलं होतं. तुम्ही जन्माला का आला आहात? आणि आयुष्याचा उरलेला वेळ तुम्हाला कसा घालवायचा आहे? इतरांवर प्रेम करण्यासाठी आणि इतरांना मदत करण्यासाठी मी या जगात आलो आहे, सेवा करून घेण्यासाठी नव्हे, तर इतरांची सेवा करण्यासाठी माझा जन्म झाला आहे, हे जर तुमचं उत्तर असेल, तर आयुष्यात सुखी होण्यासाठी जे लागतं ते तुमच्याकडे आहे. फक्त ही जाणीव मनाशी बाळगणं पुरेसं आहे. त्या क्षणी तुमचं झोपेचं सोंग संपून तुम्ही जागे व्हाल आणि एक नवी सकाळ तुमच्या समोर असेल. तुमच्या पद्धतीने काम करण्याची संधी आणि वेळ आयुष्यात तुम्हाला मिळाल्याबद्दल तुम्ही कृतज्ञ असाल.

प्रेम म्हणजे स्वीकार हे सुखी कुटुंबातलं महत्त्वाचं सूत्र आहे. रॉबर्ट फ्रॉस्ट म्हणायचा, 'घर म्हणजे अशी जागा जिने तुम्हाला सामावून घेतलंच पाहिजे.' आपल्या वाडवडिलांना, आजी-आजोबांना हे चांगलंच ठाऊक होतं. अशा प्रेमळ आनंदी कुटुंबामध्ये कुटुंबाच्या सभासदाला तो आहे तसाच त्याला स्वीकारलं जातं. अगदी माझ्यावर कुणाचं प्रेमच नाही, अशी रागाने तक्रार करणाऱ्यांना त्यांच्या रागासकट सामावून घेतलं जातं. असा स्वीकार करणं कठीण आहे, म्हणूनच तुम्ही साठीचे झाल्यानंतरच मुलं होऊ द्यावीत अशा मताला मी आलो आहे; कारण त्या वयापर्यंत कोणाचाही विनाअट स्वीकार करण्याएवढी समज आपल्याला आलेली असते.

स्वीकार केल्यावर समस्या सुटत नाहीत किंवा संकटं यायची थांबत नाहीत – ती ताकद कशातच नाही. जोपर्यंत कुटुंब अस्तित्वात आहे तोपर्यंत अडचणी येतच राहणार. आयुष्याचा आणि प्रेमाचा हाच स्थायीभाव आहे. तुमच्या अडचणींमध्ये तुमच्या कुटुंबाचाही सहभाग असतो; कारण तीच एक अशी जागा आहे जिथे तुम्ही मोकळे होऊ शकता, स्वत:ला सुरक्षित समजू शकता आणि एकमेकांशी प्रामाणिकपणे वागू शकता.

**येणारी संकटं तर तुम्ही टाळू शकत नाही, पण त्यांचं निराकरण कशा प्रकारे करायचं हे मात्र ठरवू शकता. कुटुंबातल्या त्रासदायक सदस्यांमध्ये बदल होतील आणि इतरांना होणारा त्यांचा त्रास थांबेल अशी आशा तुम्ही करू शकता. अशा सदस्यांच्या सतत मागे लागून, त्यांना समजावून सांगून, त्यांच्या डोक्याशी कटकट करून, त्यांनी स्वभाव बदलणं कसं आवश्यक आहे हे तुम्ही त्यांना पटवून देण्याचा प्रयत्न करा. त्यातून लेखकाला फक्त एक चांगली कथा मात्र मिळेल. किंवा, मग ते जसे आहेत तसं त्यांना स्वीकारा आणि त्यांच्यावर प्रेम करा. तुम्ही एखाद्याला बदलण्यासाठी सर्वस्व पणाला लावा किंवा एखाद्या व्यक्तीसाठी सर्वस्व पणाला लावा – असे दोन पर्याय मला या विचारमंथनातून मिळाले. दुसरा पर्यायच सर्वोत्तम आहे हे मी स्वानुभवाने सांगतो.**

## २
## रॉय आणि कॅरोलिनाचं बाळ

### आजोबांनाच माहीत असणारं नातवाचं गुपित

आमचा मुलगा स्टीफन जन्माला आला तेव्हा मी त्याला स्वतःच तपासण्याचा हट्ट हॉस्पिटलच्या स्टाफकडे धरला. त्या विनंतीला अर्थातच सगळ्यांनी विरोध केला. त्यांची तरी काय चूक? बाळाला कुशीत घ्यायला मागण्याच्या ऐवजी बाळाचा बाबा त्याला तपासून पाहण्याचा हट्ट करत होता. बाळ अगदी व्यवस्थित आहे असं सगळेच मला समजावत होते. शेवटी माझा हट्ट आणि डॉक्टरची पदवी पाहून परिचारिकांनी अखेर नमतं घेतलं आणि मला त्याच्याजवळ जाऊ दिलं. स्टीफनचे सगळे अवयव जागेवर आहेत ना, नाकाची–कानाची सगळी दारं उघडी आहेत ना हे मी स्वतः पाहिलं. स्टीफनचे सगळे अवयव नैसर्गिक स्थितीत ज्या त्या जागेवर आहेत, तो संपूर्णपणे ठीकठाक आहे याची मला पूर्ण खात्री पटल्यावरच मी त्याला परिचारिकांकडे सोपवलं. नंतर मी बायकोच्या सोबतीला गेलो.

स्टीफनचं परीक्षण करावं असं मला वाटण्यामागे आणि त्याची एवढी काळजी करण्यामागे अनेक कारणं होती. पिट्सबर्गमधल्या बाल चिकित्सालयात मी शल्यचिकित्सेचा निवासी डॉक्टर होतो. बारा महिन्यांच्या त्या काळात मी एकही व्यवस्थित बालक पाहिलं नाही. जी मुलं मी पाहिली आणि ज्यांच्यावर उपचार केले त्यांच्यासारखंच आपलंही मूल असेल असं मला वाटण्याचं काहीच कारण नव्हतं; पण मला तसं वाटलं खरं. हे आमचं तिसरं अपत्य होतं. बॉबीला बाळंतपणात काहीही त्रास झालेला नव्हता आणि आधीची मुलंही अगदी ठणठणीत होती; पण मुलांमधली व्यंग, अपंगत्व मी इतक्या प्रमाणात पाहिलं होतं की मनात त्याची धास्ती बसल्यासारखी झाली होती. आपल्या अगदी जवळचं, प्रेमाचं कोणीतरी – आपलं मूलच सव्यंग जन्माला येईल या भीतीने माझ्यातल्या बापाला घेरलं होतं. म्हणतात ना, मन चिंती ते वैरी न चिंती, अगदी तसंच झालं होतं माझं. त्यामुळे स्टीफनचा जन्म झाल्यावर लगेच मला त्याला तपासायची घाई झाली होती.

आयुष्यात नक्की कोणत्या गोष्टींना महत्त्व द्यायचं याची थोडी थोडी जाण मला वैद्यकी सोडल्यानंतरच्या काळात यायला लागली. तोपर्यंत आमच्या चौथ्या आणि पाचव्या जुळ्या अपत्यांचा जन्म झालेला होता. या वेळेपर्यंत मात्र माझी भूमिका, मी डोकेदुखी ठरण्यापासून ते मदतीचा हात बनण्यापर्यंत बदललेली होती. जुळ्यांच्या जन्माच्या वेळी वडिलांना प्रसूती पाहण्यास मनाई करण्यात आलेली होती; पण मी ही प्रसूती इंटरकॉमवर ऐकू शकलो. आमची एकुलती एक मुलगी – कॅरोलिन – आधी बाहेर आली. तिचा भाऊ केथ अगदी सभ्य गृहस्थासारखा तिच्या मागून आला. या वेळी मात्र बाळांची काळजी वाटण्यासाठी सबळ कारण आमच्याकडे होतं. या गरोदरपणाच्या पहिल्या तिमाहीतच बॉबीला जर्मन गोवराची लागण झालेली होती – ज्यामुळे बाळांना त्रास होऊ शकत होता; पण आता मी अधिक समजूतदार आणि शहाणा झालो होतो. प्रेम आणि आयुष्य यांच्याबद्दल काहीतरी शिकायला लागलो होतो. या वेळी मी बाळांच्या तपासणीचा हट्ट धरला नाही.

मी मुलांचे परीक्षण करायचा हट्ट धरत नसलो तरी वडील म्हणून मला अजून बरंच काही शिकायचं होतं. जशी माझी मुलं वाढत होती तशी त्यांच्या मानसिक जडणघडणीपेक्षा शारीरिक वाढीबद्दल मला जास्त काळजी होती. माझं त्यांच्यावर खूप प्रेम होतं; पण मनात सतत धास्ती असायची – ही मुलं

नॉर्मल नसती तर काय झालं असतं? त्यांना जन्मतःच कोणतीतरी दुर्धर व्याधी किंवा भयंकर आजार असता तर? किंवा आता झाला तर? आम्ही काय केलं असतं?

जन्मल्यानंतर जवळजवळ पाच वर्षांनी, जुळी मुलं पूर्वप्राथमिक शाळेच्या वयात असताना असं कळलं की त्यांना कमी ऐकू येतं. त्यांना शारीरिक व्यंग आहे. ही गोष्ट आमच्या कधीच लक्षात आलेली नव्हती. त्या व्यंगासह जुळे त्यांच्या इतर भावंडांमध्ये सहजतेने मिसळून गेलेले होते. त्यांचं बालपण, लहानपण इतरांसारखंच आरोग्यदायी गेलं आणि मोठ्या भावंडांच्या पावलावर पाऊल टाकत तेही आनंदी, कृतिशील अशा प्रौढपणात आले. कॅरोलिनने रॉय नावाच्या देखण्या तरुणाशी लग्न केलं. कॅरोलिन गरोदर राहिली तेव्हा तिच्या प्रसूतीच्या वेळी मी तिथे थांबावं अशी गळ मला तिने नी रॉयने घातली.

कॅरोलिनला प्रसववेदना सुरू झाल्या आणि प्रसूती जवळ यायला लागली तसं लक्षात आलं की तिचा योनीमार्ग लहान असल्यामुळे बाळ त्यातून बाहेर येऊ शकत नाही. बाळाचं डोकं त्याच्या आजोबांसारखं मोठं आहे असं हॉस्पिटलच्या परिचारिका आणि इतर स्टाफ म्हणाला. सगळ्याच गोष्टींसाठी एकूणातच मला जबाबदार धरल्यासारखं दिसत होतं. जिथे कॅरोलिनचा जन्म मी इंटरकॉमवरून ऐकला होता तेच हे हॉस्पिटल होतं. आता बाबा आणि आजोबांना प्रसूतीसाठी आईच्या जवळ थांबायची परवानगी होती; पण सीझरसाठी मात्र फक्त बाबालाच आत थांबायची परवानगी होती. तरीही, रॉयच्या हट्टामुळे त्याच्या सासऱ्यांना – म्हणजेच अस्मादिकांना आत थांबायला मिळालं.

प्रसूतीतज्ज्ञाने शस्त्रक्रिया सुरू केली तेव्हा मी आणि रॉय, कॅरोलिनच्या डोक्यापाशी उभे होतो. प्रसूतीतज्ज्ञांनी उचललेलं पॅट्रिकचं फिकट सावळं शरीर मी पाहिलं. मी पॅट्रीकला जगातला पहिला श्वास घेताना ... त्याचा रडण्याचा पहिला आवाज ऐकला. ... तो कसाही असला तरी मी त्याच्यावर निस्सीम प्रेम करणार आहे हे त्याच क्षणी मला उमगलेलं होतं. त्याचे सगळे अवयव व्यवस्थित जागेवर आहेत की नाहीत, काही कमीजास्त नाही ना, त्याला कुठलं व्यंग नाही ना – सगळंच आता नगण्य होतं. त्याला माझं खूप प्रेम मिळालं. त्याला जे काही हवंय त्यासाठी मी त्याच्यासोबत असावं हे

स्वत:लाच दिलेलं माझं वचन मी पाळलं. आठवणीत जपून ठेवलेला त्याच्या जन्माचा क्षण आता विचार करताना आठवला की मनात प्रेम भरून येतं आणि डोळ्यांत पाणी...

बालकांच्या हॉस्पिटलमध्ये बालशल्यविशारद पेडिएॅट्रिक सर्जन म्हणून काम पाहताना रोजच डोळ्यांसमोर असणारी सव्यंग, दिव्यांग मुलं मी आजही विसरलेलो नाही. स्टीव्हला ज्या उतावीळपणे मी तपासलं तेही मी विसरलो नाही. मुलं काही शारीरिक व्यंग घेऊन जन्माला येतात ते मला आजही नीट माहीत आहे. मला हेही माहीत आहे की माझ्या जवळच्या व्यक्तींना कर्करोग, एड्स, हृदयरोग यांसारखे असंख्य गंभीर आजार होऊ शकतात; पण मी आता त्या भीतीला ओलांडून पुढे आलोय – आयुष्याकडून खूप काही शिकलोय. इतक्या भयंकर गोष्टी घडू शकतात किंवा गंभीर थराला जाऊ शकतात की व्याधी किंवा व्यंग परवडलं असं म्हणायची वेळ येते, हे आता मला चांगलंच समजलेलं आहे. मला आणि बॉबीला जर आता मूल झालं तर मला त्याच्या व्यंगाची काळजी वाटणार नाही. उलट मी म्हणेन, प्रेम करण्याची अजून एक संधी मला मिळालेली आहे. त्या बाळात जी कमतरता असेल ती असो. आम्ही उत्तम प्रकारे त्याला सांभाळू. आणि कोणी सांगावं, यातूनही आम्हाला काहीतरी चांगलंच मिळेल, अनेक गोष्टी शिकता येतील.

मी तरुण असताना माझ्या मुलाची जी अतिरेकी काळजी केली तसं सगळेच पालक करत नाहीत. मी वर जो विचार मांडला तेवढी समज त्यांना असते; पण आयुष्य जसं सामोरं येतं तसं त्याला स्वीकारण्याची क्षमता आजोबा –आजींमध्ये जास्त असते. पॅट्रीकच्या जन्मानंतर ही जाणीव मला प्रकर्षाने झाली. अरेच्चा! मी एक छान प्रेमळ आजोबा झालो होतो आणि प्रेमाची एक वरची पायरी चढलो होतो. लोकांनी साठीच्या घरात गेल्याशिवाय पालकत्व स्वीकारू नये असं माझं मत तेव्हापासून झालं. किंवा मग पालक बनल्यानंतर लोकांनी साठीचे असल्यासारखं वागावं तरी! आजी-आजोबांचं शहाणपण आचरणात कसं आणता येईल हे लोकांना शिकवण्याची गरज आहे. बदकाच्या काळ्या कुरूप पिल्लाला जर आजी–आजोबांइतके शहाणे पालक मिळाले असते तर त्याला आपलं खरं सुंदर रूप पाहण्यासाठी घर सोडून जावंच लागलं नसतं. त्याच्या कुटुंबाच्या प्रेमळ –तृप्त चेहेऱ्यांमध्येच त्याला स्वत:च्या सुंदर रूपाचं प्रतिबिंब पाहायला मिळालं असतं!

अभिप्राय

# टू सर, विथ लव्ह




एक छोटीशी कादंबरी म्हणा किंवा आत्मलेखन म्हणावे असे पुस्तक. पुस्तकाचा नायक म्हणजे स्वतः लेखक, श्री. ब्रेथवेट. एक सत्य कहाणी आपण पुस्तक वाचत असताना उलगडते आणि आपण या ओघवत्या अनुवादात, या आत्मकथनात गुंतत जातो, जसा नायक त्याच्या कथानकात गुंतलेला आढळतो. दुसऱ्या महायुद्धात आपला नायक हा रॉयल एअरफोर्समध्ये ग्राउंड क्रूमध्ये काम करत असे. युद्ध संपल्यावर सक्तीची निवृत्ती पत्करावी लागते. मग नोकरीसाठी वणवण चालू होते. केवळ कृष्णवर्णीय आणि इंग्लंडमध्ये न जन्मलेला इंग्लिश माणूस असल्यामुळे नोकरी मिळणे किती दुरापास्त होते याचे वर्णन म्हणजे ब्रिटिशांच्या वर्णद्वेषाचा धगधगता नमुना आहे. इंग्लंडबाहेरचा म्हणजे लेखकाचा जन्म गयानातील जॉर्जटाऊन येथील निग्रो घरातील. अनेक अपमान, शिव्याशाप मूग गिळून सोसल्यावर नायकाला एक अतिशय

सामान्य अशी शिक्षकाची नोकरी मिळते. तीही कुठे, तर अतिशय गलिच्छ, अतिदरिद्री अशा वस्तीत टग्या मुलामुलींच्या शाळेत. एक सामान्य तरुण ध्येयाने प्रेरित झालेला शिक्षक कसा घडतो आणि आपल्या विद्यार्थ्यांचे भविष्य घडविण्यास कसा हातभार लावतो याचे हे कथानक म्हणजे उत्कृष्ट उदाहरण आहे. प्रत्येकाने हा अनुवाद किंवा मूळ इंग्रजी पुस्तक जरूर वाचावे. कथानकाचा काळ हा दुसरे महायुद्ध संपल्या नंतरचा असला तरी पुस्तक संदर्भहीन वाटत नाही, यातच या लेखकाचे यश आहे.

**– प्रदीप तळेकर**

# स र वा




पुणे आकाशवाणीमध्ये नाग आला आणि तो मारायला आकाशवाणीच्या अधिकाऱ्यांनी व्यंकटेश माडगूळकरांना बोलावलं.... माडगूळकर बांबूच्या जंगलात हरवले. दूरदूरपर्यंत कोणी दिसेना, रात्र जंगलात काढायची वेळ आली; पण एका वाटेवर गायीचं शेण दिसलं आणि त्यावरून त्यांनी जवळच्या गावाचा रस्ता शोधला. माडगूळकरांनी एकदा अरण्यवाचन केलं. संपूर्ण रान वाचून आपल्यासमोर उभं केलं. हे सगळं वर्णन वाचायचं असेल तर त्यांचं ‘सरवा’ पुस्तक वाचायला हवं. पुस्तकाचं नाव ‘सरवा’ ठेवलं आहे; कारण शेत तोडून झाल्यावर खाली जे दाणे, पीक उरतात त्याला ‘सरवा’ म्हणतात. माडगूळकरांनी विपुल लेखन केलं. ‘सामना’ दैनिकात लिहिलेल्या लेखांचं हे पुस्तक आहे. या पुस्तकात प्राणी, वनस्पती यांची अनेक निरीक्षणे आहेत आणि सोबत माणूसही वाचला आहे. त्यामुळे हे पुस्तक एकदा तरी वाचायला हवे.

**– निरेन आपटे**

# बकुळा

‘बकुळा’ ही सुधा मूर्तींची प्रेमकथा. श्रीकांत आणि श्रीमतीची. साधी सरळ, समजण्यासाठी सोपी, वाचकाला खेळवून ठेवणारी. प्रेम तर आहेच;

पण संघर्ष देखील आहे त्या दोघांचा. यशाच्या मागे धावता धावता श्रीकांत खूप पुढे निघून जातो आणि श्रीमती मात्र तिथेच राहते मनाने. कथेचा शेवट अगदी चटका लावून जातो मनाला, स्तब्ध करून जातो; कारण श्रीमतीने घेतलेला एक निर्णय जो सहजासहजी कोणीच घेणार नाही. श्रीकांतने बकुळीची फुले जपली; पण सुगंध नाही जपता आला त्याला...





**– अर्चना गोरे**

# कर हर मैदान फ़तेह

मा.रा.रा.श्री.विश्वास नांगरे पाटील साहेब,(I.P.S.) सह आयुक्त, मुंबई पोलीस,

सर,




आत्ताच आपले नवे पुस्तक 'कर हर मैदान फ़तेह' वाचून झाले. अपेक्षेप्रमाणे हेही पुस्तक अतिशय उत्तम झाले आहे; कारण ते लिहिण्यामागचा आपला हेतू अतिशय उदात्त आहे. या पुस्तकामुळे युवकांनाच काय पण सर्वच वयोगटांतील विचारशील व्यक्तींना योग्य/अयोग्य काय, काय करावे, काय करू नये याचे बहुमोल मार्गदर्शन मिळेल. तसेच M.P.S.C./ U.P.S.C.च्या विद्यार्थ्यांना आपण परीक्षा पास होऊ; पण नंतरचे ट्रेनिंग झेपेल का याचे प्रामाणिक उत्तर शोधण्यास भाग पाडेल. कदाचित त्यांना वस्तुस्थितीची जाणीव होऊन, योग्य निर्णय घेऊन, वेळीच त्यांचा वेळ, पैसे इ.नुकसान व अपेक्षाभंगाचे दु:खही टळेल. सध्या या परीक्षेसाठी भाऊगर्दी आहे ती कमी होईल. या विद्यार्थ्यांच्या मानसिकतेचा फायदा उठवणाऱ्या सर्व प्रकारच्या बाजारू व्यक्ती व वृत्तींना आळा बसेल. काही अब्ज रुपये व तेवढेच मनुष्य तास वाचतील. यासाठी हा महाराष्ट्र आपला कायम ऋणी राहील. तसेच आपण मोबाइल, इंटरनेट,सोशल मीडिया यांचे गंभीर, धोकादायक स्वरूप पण विस्ताराने उलगडून दाखवले आहे. त्यामुळे हे पुस्तक संपूर्ण समाजालाही जागे करणारे आहे. यामुळे हे पुस्तक प्रत्येक युवक-युवतीने तर वाचलेच

ते सगळे काही जसेच्या तसे वाचकांच्या अनुभवास येते. कादंबरीचा प्रवास जसा सुरू होतो, तसा आपलाही या महाविद्यालयात प्रवेश होतो . नंतर जे जे घडत जाते त्याला वाचक म्हणून आपण साक्षीदार उरतो. राणी, मंकी, भट्टी, मंदार, संजना, जाधव सर, देशपांडे सर.. कादंबरीतील एक एक पात्र हळूहळू आपल्या ओळखीचे होत जाते. कॅमेऱ्याच्या डोळ्यांनी लेखक आपल्याला त्या विश्वात फिरवत राहतो. लेखकाला परकाया प्रवेश करता यायला हवा, असे म्हणतात. पात्रांच्या मनात शिरून त्यांच्यासारखे, लेखकाला लिहिताना मानसिक पातळीवर जगावे लागते. तरच ती पात्रं जिवंत होतात. जिवंतपणे कादंबरीमध्ये वावरू लागतात. इथे तरुण पिढीच्या मनात शिरून त्यांचे जगणे बाबाराव मुसळे हे समरसून जगले आहेत. कोणताही परिसर फक्त बघून निरीक्षण करून ओळखीचा होत नाही; तर त्या परिसरात राहून तो परिसर आपलासा करावा लागतो. तरच तो परिसर, तो माहोल जिवंतपणे उभा करता येतो. लेखक बाबाराव मुसळे यांनी अभियांत्रिकी महाविद्यालयात, साहिल मंझील मधील मुलींचे हॉस्टेल बोलते केले आहे. अगदी राणी-मंकीची रूमसुद्धा आपल्या ओळखीची होऊन जाते. अध्यापन, व्यवस्थापन, त्यातील खाचाखोचा, त्यातील अदृश्य राजकारण लेखकाने नीटपणे समजून घेतले आहे. शिस्त, नियम, आचारसंहिता याकडे बघण्याची व्यवस्थापनाची बाजू रास्त वाटते; तर तीच विद्यार्थ्यांच्या नजरेतून बघताना आणखी वेगळी वाटते. शरीरसंबंध, कॉन्डोम, पिल्स, डेटिंग, चॅटिंग याबाबत तरुणाई एवढी सहज झालेली आहे की वाचताना नंतर नंतर धक्कादायक काहीच वाटत नाही. घराबाहेर आपली मुलं किती सुरक्षित असतात? चांगल्या-वाईट संगतीचे त्यांच्यावर कसले परिणाम होतात? मोबाइल, इंटरनेट, चॅटिंग, एसएमएस, पोर्नोग्राफी, भिन्नलिंगी आकर्षण, स्वातंत्र्याचा उपभोग घेण्याची मानसिकता, चंगळवादी, मौजमजा करण्याचा दृष्टिकोन, त्यातील धोके, अडचणी, जिवावर बेतणारे प्रसंग, यांसारख्या अनेक पैलूंवर प्रकाश टाकत ही कादंबरी पुढे सरकत राहते. तरुणाईची भाषा, त्यांचे एसएमएस, चॅटिंग त्यांचे शॉर्टफॉर्म्स, त्यांनी मित्रांना-मैत्रिणींना दिलेली नावे, त्यांचे आपसातील संभाषण, त्यांची अभिव्यक्ती, त्यांचे स्वभाव विशेष... सर्व काही नेमकेपणाने साधले गेले आहे. विद्यार्थी-विद्यार्थिनींची देहबोली, त्यांचे पेहराव, त्यातील बिनधास्तपणा, त्यांच्या आक्रमक फॅशन्स, हे जग कुठेही कृत्रिम वाटत नाही.

पाहिजे; पण प्रत्येक कुटुंबाने, प्रत्येक व्यक्तीने वाचून स्वतः मध्ये आवश्यक त्या सुधारणा केल्या पाहिजेत. हे पुस्तक 'व्यक्तिमत्त्व विकास'साठी सर्वांगाने उत्कृष्ट पुस्तक आहे. आपले अत्यंत अभ्यासपूर्ण संदर्भासह ओघवते सादरीकरण खिळवून ठेवते. आपल्या तल्लख स्मरणशक्तीचे कौतुक करावे तेवढे थोडेच आहे. तसेच आपले माता-पिता, गुरूजन , दोन्ही अकादमीमधले आपल्या ट्रेनर्सविषयीची आपली कृतज्ञता अभिनंदनीय आहे. इतके सुरेख पुस्तक सादर केल्याबद्दल आपले, प्रकाशक व संपूर्ण टीमचे खूप खूप आभार. आपल्या भावी आयुष्यासाठी हार्दिक शुभेच्छा व पुन्हा एकदा खूप खूप धन्यवाद !

**– महावीर शाह**

# नो नॉट नेव्हर




जेष्ठ लेखक बाबाराव मुसळे यांची 'नो नॉट नेव्हर...' ही अलीकडेच प्रकाशित बहुचर्चित कादंबरी. ही कादंबरी म्हणजे मुळात सत्तर वर्षे वयाच्या लेखकाने तिसऱ्या पिढीतल्या तरुणाईच्या मानसिकतेत शिरून, तरुणाईची भाषा जाणून घेत, इंजिनिअरिंग कॉलेजमधील त्यांचे 'ॲडव्हान्स कॉलेज लाइफ' कादंबरीत हुबेहूब चितारणे, हा एक साहित्यिक चमत्कारच म्हणावा लागेल. हा चमत्कार लेखक बाबाराव मुसळे यांनी करून दाखवल्याबद्दल त्यांच्या सर्जनशीलतेला दाद द्यावी तितकी थोडीच. पुण्यातले एक इंजिनिअरिंग कॉलेज. विदर्भातल्या वाशीम जिल्ह्यातल्या ब्रह्मा या खेडेगावातल्या राणी आणि मंकी ऊर्फ मृणाल या दोन विद्यार्थिनी. दोघींचे स्वभाव अतिभिन्न. अगदी टोकाचे म्हणावे असे. जणू दोन समांतर रूळ एकमेकांसोबत धावणारे; पण कधीही जवळ न येणारे असे. या महाविद्यालयात प्रवेश करतानाचा विद्यार्थ्यांचा सुरुवातीचा सैरभैरपणा, कॉलेज विश्व , टीचर्स स्टाफ, कर्मचारी, प्रिन्सिपल, संस्थाचालक, लायब्ररी, कॅन्टीन, व्यवस्थापनाची कडक शिस्त, जर्नल्स, प्रॅक्टिकल्सची रुक्ष बाजू.... सगळं काही अभ्यासपूर्ण शैलीने समजून घेऊन तंतोतंत मांडले आहे. यामुळे

हे सगळं उभारणं अभ्यासू वृत्तीशिवाय, मेहनतीशिवाय अजिबात शक्य नाही. कादंबरीच्या कथानकाचा उलगडा करून रसभंग करणे क्षम्य होणार नाही. पण, 'अॅटलिस्ट एक तरी कॉन्डोम पर्समध्ये बाळगत जा. कधी कोणता प्रसंग येईल ते सांगता येत नाही. तसा प्रसंग आलाच तर शक्यतो अव्हॉइड करायचा प्रयत्न करायचा. ते जमलं नाहीच तर त्याला कॉन्डोमचा यूज करायची विनंती करायची.' एका मैत्रिणीने दुसऱ्या मैत्रिणीला दिलेला हा संदेश महाविद्यालयीन तरुणींच्या सेक्स लाइफची भयावहता दर्शवतो किंवा 'नो इंटरकोर्स विदाउट कॉन्डोम' हे सेक्सचं मध्यवर्ती सूत्र सांगणारे संवाद यातील भीषणता दर्शवित असल्याने त्याचा आवर्जून उल्लेख करावासा वाटतो. कादंबरीत अनेक बऱ्या-वाईट घटना अचानकपणे येऊन आदळतात; पण ओढूनताणून कथानकाची जुळवणी केलेली कुठेही जाणवत नाही. काही घटनांमागील उकल लेखकाने रहस्यकथेच्या शैलीत केली आहे. त्यामुळे वाचताना कथानकाची रंजकता आणखीनच वाढते. एकंदरीत लेखक बाबाराव मुसळे यांनी आपले वय कमी करून या तरुणाईसोबत तरुण होत नुकतेच अभियांत्रिकी महाविद्यालयात शिक्षण घेतले आहे की काय, असे वाटावे इतपत ही कादंबरी तरुणाईची झालेली आहे. ही कादंबरी तरुणाईला नक्की आपली वाटणार, या कादंबरीवर तरुणाईच्या नक्की उड्या पडणार, यात शंका नाही. तरीही भरकटलेल्या, भरकटू पाहणाऱ्या महाविद्यालयीन तरुण-तरुणींना एक सकारात्मक, आश्वासक संदेश देऊन ही कादंबरी संपते, हे या कादंबरीचे मोठे यश होय.

**– महाराष्ट्र टाइम्स, नागपूर**
**बुधवार १३/१/२०२१**

१६ फेब्रुवारी ते १५ मार्च २०२१ दरम्यानचा दिनविशेष

## दिनविशेषानिमित्त पुस्तकसंचावर ५० टक्क्यांपर्यंत सूट

**खालील संचांवर १६ ते २८ फेब्रुवारी दरम्यान खास सवलत**

**१६ फेब्रुवारी - एकहार्ट टोले यांचा जन्मदिन**

'अवनी एक नवी' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत २४०/- । सवलत किंमत १५९/-**

---

**१७ फेब्रुवारी - अविनाश लोंढे यांचा जन्मदिन**

'बेधुंद' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत २५०/- । सवलत किंमत १५९/-**

---

**१८ फेब्रुवारी - तेहमिना दुर्रानी यांचा जन्मदिन**

'ब्लास्फेमी' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत २६०/- । सवलत किंमत १६९/-**

---

**१९ फेब्रुवारी - छ. शिवाजी महाराज जयंती**

'जाणता राजा श्री शिवछत्रपती', 'श्रीमान योगी', 'लक्ष्यवेध', 'शिवचरित्रापासून आम्ही काय शिकावे?', 'शिवछत्रपती : एक मागोवा' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ११६५/- । सवलत किंमत ८२९/-**

---

**२० फेब्रुवारी - टोनी विल्सन यांचा जन्मदिन**

'शॅपेल'(मराठी) या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत २४०/- । सवलत किंमत १३९/-**

---

**२१ फेब्रुवारी - प्रा. डॉ. कैलास सार्वेकर यांचा जन्मदिन**

'मराठी ग्रामीण कवितेचा इतिहास' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत २९५/- । सवलत किंमत १७९/-**

---

**२४ फेब्रुवारी - डॉ. सुचित तांबोळी यांचा जन्मदिन**

'मुलांच्या समृद्ध जीवनासाठी' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत २६०/- । सवलत किंमत १६९/-**

---

**२४ फेब्रुवारी - छ. राजाराम महाराज जयंती**

'शिवपुत्र राजाराम' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत २६०/- । सवलत किंमत १६९/-**

**२५ फेब्रुवारी - डॉ. आ. बा. पाटील यांचा जन्मदिन**
'बोन्साय', 'घरातील बाग', 'शेती करू फायद्याची', 'सुंदर आपली फुलबाग', 'सुंदर आपली फळबाग' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत ८८०/- । सवलत किंमत ५४९/-**

**२५ फेब्रुवारी - डॉ. आशिष बोरकर यांचा जन्मदिन**
'स्थूलतेला करा टाटा' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत १५०/- । सवलत किंमत ८९/-**

**२७ फेब्रुवारी - मराठी राजभाषा दिन**
रु. ३०००च्या खरेदीवर ४० टक्के सवलत

**२८ फेब्रुवारी - राष्ट्रीय विज्ञान दिन**
**संच १**-'ATOZ विज्ञान', 'वैज्ञानिक खेळणी', 'छंदातून विज्ञान', 'साधी यंत्रे', 'विज्ञानातील रंजकता', 'विज्ञानातील गमतीजमती', 'अंतरिक्षाच्या अंतरंगात', 'प्रेमाचा रेणू', 'अंतराळातील मृत्यू', 'अश्मजीव', 'संकरित', 'डिंभक', 'देव? छे! परग्रहावरील अंतराळवीर', 'पृथ्वीवर माणूस उपराच!', 'अज्ञाताचे विज्ञान' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत २२९०/- । सवलत किंमत १४३९/-**

**संच २**-'तंत्रज्ञानाची मुळाक्षरे भाग-१', 'तंत्रज्ञानाची मुळाक्षरे भाग-२', 'असे घडले सहस्रक', 'प्रयोग वनस्पती विज्ञानाचे', 'अंतरिक्षाचा वेध','विज्ञानातील सरस आणि सुरस', 'नॉस्त्रादेमसची भविष्यवाणी', 'फक्त खेळण्यांसाठी', 'खेळणीच खेळणी', 'खेळणी विज्ञानाची', 'विज्ञान गमती', 'विज्ञान जमती', 'चला, प्रयोग करू या!' (३ पुस्तकांचा सेट), 'इ.स. २५९५' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत २३४५/- । सवलत किंमत १४४९/-**

**संच ३** - 'गार्डिअन', 'जॉर्ज अ‍ॅन्ड द बिग बँग', 'जॉर्जेस कॉस्मिक ट्रेझर हंट', 'जॉर्जेस सिक्रेट की टू द युनिव्हर्स', 'रोबॉट फिक्सिंग', 'स्वप्नचौर्य', 'असे शास्त्रज्ञ, असे संशोधन', 'आपल्या पूर्वजांचे तंत्रज्ञान', 'आपल्या पूर्वजांचे विज्ञान', 'कथारूपी खगोलशास्त्र', 'शास्त्रज्ञांचे जग', 'अशक्य भौतिकी' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ३४३५/- । सवलत किंमत २१४९/-**

**२८ फेब्रुवारी - स्टीव्ह मार्टिनी यांचा जन्मदिन**

'क्रिटिकल मास', 'द ॲटर्नी', 'द सिमीऑन चेंबर' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत १०८०/- । सवलत किंमत ६४९/-**

**२९ फेब्रुवारी - सायमन टॉएन यांचा जन्मदिन**

'सँक्टस' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत ६००/- । सवलत किंमत ३१९/-**

**खालील संचांवर १ ते १५ मार्च दरम्यान खास सवलत**

**१ मार्च - पांडुरंग कुंभार यांचा जन्मदिन**

'उधाण' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत १५०/- । सवलत किंमत ८९/-**

**४ मार्च - प्रिया कुमार यांचा जन्मदिन**

'परवाना जगण्याचा', 'प्रतिरूप' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ४४५/- । सवलत किंमत २९९/-**

**४ मार्च - खालिद हुसैनी यांचा जन्मदिन**

'द काइट रनर', 'ए थाउजंड स्प्लेन्डिड सन्स', 'अँड द माउंटन्स एकोड' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत १०८०/- । सवलत किंमत ६९९/-**

**४ मार्च - दिप्ती जोशी यांचा जन्मदिन**

'नि:शब्दाचे मौन' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत १४०/- । सवलत किंमत ८९/-**

**७ मार्च - पिअर्स पॉल रीड यांचा जन्मदिन**

'अलाइव्ह' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत १७०/- । सवलत किंमत १०९/-**

**७ मार्च - ई. एल. जेम्स यांचा जन्मदिन**

'फिफ्टी शेड्स फ्रीड', 'फिफ्टी शेड्स ऑफ ग्रे', 'फिफ्टी शेड्स डार्कर'

या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत २१००/- । सवलत किंमत १३४९/-**

**८ मार्च - रश्मी बन्सल यांचा जन्मदिन**

'अराइज, अवेक', 'स्वप्नांचे इंद्रधनू...', 'टेक मी होम', 'कनेक्ट द डॉट्स', 'आय हॅव अ ड्रीम' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत १६३०/- । सवलत किंमत १०६९/-**

**८ मार्च - महिलादिन**

'रुपेरी 'सिंधू'', 'क्रांतियोगिनी भगिनी निवेदिता', 'कर्मयोगिनी', 'चिकन सूप फॉर द वुमन्स सोल भाग - २', 'चिकन सूप फॉर द वुमन्स सोल : भाग ३', 'नोबेल ललना - भाग १' , 'नोबेल ललना - भाग २', 'स्वप्नाकडून सत्याकडे...(कल्पना चावलाची कहाणी)', 'अंतराळवीर सुनीता विल्यम्स', 'ॲज आय सी... भारतीय पोलीस सेवा...', 'ॲज आय सी... नेतृत्व आणि प्रशासन...', 'ॲज आय सी... स्त्रियांचे सक्षमीकरण...', `Be The Change... भ्रष्टाचाराशी लढा', 'आय डेअर', 'इट्स ऑलवेज पॉसिबल', 'मजल... दरमजल...', 'व्हॉट वेंट रॉंग अँड व्हाय', 'दयादीपिका फ्लॉरेन्स नाइटिंगेल', 'जाणती राणी महाराणी ताराबाई', 'कृष्णसखी राजराणी मीराबाई', 'ममतेची मूर्ती मदर तेरेसा', 'रणरागिणी दुर्गाराणी', 'सती साध्वी देवी अहिल्या', 'बंधमुक्त होताना...', 'ब्रह्मकन्या', 'माय डॉटर माय मदर' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत ५१८०/- । सवलत किंमत ३१०९/-**

**१२ मार्च - यशवंतराव चव्हाण यांचा जन्मदिन**

'वादळ माथा ते १९६५ भारत-पाक युद्ध', 'पहिली फेरी?', 'साहेब संध्याकाळी भेटले..' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत ६६५/- । सवलत किंमत ३४९/-**

**१४ मार्च - शेवडे गुरुजी यांचा जन्मदिन**

शेवडे गुरुजी लिखित २१ पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत २०८०/- । सवलत किंमत १३९९/-**

**१४ मार्च - जॉन लेन यांचा जन्मदिन**

'THE ART OF AGEING' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत १६०/- । सवलत किंमत ९९/-**

२७ फेब्रुवारी

आमुच्या पिलापिलात जन्मते मराठी
आमुच्या लहानग्यात रांगते मराठी
आमुच्या मुलामुलीत खेळते मराठी
आमुच्या घराघरात वाढते मराठी

आमच्या सर्व पुस्तकांवर

# ४०%

# सवलत

# मराठी

## राज्यभाषा दिनाच्या सहर्ष शुभेच्छा !!!

किमान ₹३०००
(नेट ₹१८००)च्या खरेदीवर
(एका पुस्तकाची एक प्रत)

ऑफर २६ फेब्रुवारी ते ३ मार्च पर्यंत

G Pay +91 94223 23039

९४२०५९४६६५

मेहता पब्लिशिंग हाऊस | मेहता बुक सेलर्स

sales@mehtapublishinghouse.com
www.mehtapublishinghouse.com

**Postal Reg. No. PCW/086/2021 – 2023**
**RNI. No. MAHMAR/2000/02739**
**No. CSO/Pune City/SR/3/2021 - Date : 10/01/2021**
Posting at BPC - Vishrambaug Wada, CSO, Pune - 411030.
Publication Date : 09/02/2021 Posting Date : 11/02/2021

## नवीन संहिता... नवा आशय...



















**मेहता मराठी ग्रंथजगत**
१९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड,
टेलिफोन भवन समोर, पुणे-३०. फोन-०२० २४४७६९२४

प्रति,